गार्डन सुपर वाईझर पाहिजे
लॅंडस्केपिंग व नर्सरीची माहिती असणारी व्यक्ती अर्जासह भेटा साई-ईन हॉटेल, चोंढी अलिबाग-रायगड
संपर्क : मोबा. ९९२०५१००२८

रायगड, शनिवार दि. २८ जानेवारी, २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

शेकाप नेते संपतराव पवार पाटील यांचा आज नागरी सत्कार

मुंबई : संपूर्ण आयुष्य शेतकरी, गोरगरीब आणि वंचितांसाठी खर्ची घातलेल्या शेकापचे माजी आमदार संपतराव पवार-पाटील यांचा उद्या अमृतमहोत्सवानिमित्त सर्वपक्षीय नागरी सत्कार करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते यांच्या हस्ते होणार आहे. संपतबापू यांचा ३१ जानेवारीला अमृतमहोत्सवी वाढदिवस होत असल्याने उद्या नागरी सत्कारासह आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सर्वपक्षीय अमृतमहोत्सवी गौरव समितीचे अध्यक्ष आ. हसन मुश्रीफ आहेत.

अलिबागमध्ये मिळणार पासपोर्ट

● पोस्ट कार्यालयात तयारी सुरु ● आ. जयंत पाटील यांच्या मागणीला यश

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील नागरिकांना पासपोर्ट काढायचा असल्यास ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ठाणे कार्यालय गाठावे लागत असे. रायगडकरांची या त्रासातून सुटका करण्याच्या उद्देशाने आ. जयंत पाटील यांनी अलिबागमध्येच पासपोर्ट कार्यालय सुरु करण्याची मागणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत अलिबाग येथील पोस्ट ऑफिसमध्ये पासपोर्टचे कार्यालय सुरु होण्यास मंजुरी मिळाली असून, त्यादृष्टीने बांधकामदेखील सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे पासपोर्ट कार्यालय उभारणीला वेग आला असल्याने आ. जयंत पाटील यांनी समाधान व्यक्त करीत नितीन गडकरी आणि केंद्र सरकारला धन्यवाद दिले आहेत.

रायगड जिल्हा हा फार मोठा आहे. त्यामुळे या जिल्ह्यातील दुर्गम भागातून येणाऱ्या स्थानिकांना ठाणे येथे जाऊन पासपोर्ट संबंधित कामे करताना फार त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अलिबाग हे शहर रायगड जिल्ह्याचे केंद्र स्थान असल्याने या ठिकाणी पासपोर्ट कार्यालय सुरु झाल्यास जिल्ह्यातील लोकांची होणारी हेळसांड थांबावी ●➤ पान २ वर

मुख्यमंत्री खोटारडे

आंदोलक आशा सेविकांचा आरोप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २५ जानेवारी रोजी मानधन वाढविण्याबाबत चर्चा करूनही शब्द पाळलेला नाही आहे. त्यामुळे हे सरकार खोटारडे असल्याचा आरोप अंगणवाडी तसेच आशा सेविकांनी केला आहे. अलिबाग येथे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर शुक्रवारी शेकडो आशा व अंगणवाडी सेविका आपल्या मागण्यांसाठी धडकल्या. अंगणवाडी सेविकांना २० हजार तर गट प्रवर्तकांना २२ हजार रुपये दरमहा वेतन द्या, या प्रमुख मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याविरोधात आंदोलनकर्त्या महिलांनी घोषणाबाजी करून परिसर दुमदुमून सोडला होता.

गट प्रवर्तकांना २२ तर सेविकांना २० हजार रुपये वेतनाची मागणी

एकात्मिक बालविकास सेवा योजनेत काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनिसांच्या मागण्या भारत सरकारने मान्य कराव्या यासाठी शुक्रवारी रायगड जिल्हाधिकारी ●➤ पान २ वर

वेधक

मोहसीन शेख हत्या; सर्व आरोपी निर्दोष

मुंबई : २०१४ साली घडलेल्या मोहसीन शेख हत्या प्रकरणातील सर्व २० आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. हिंदू राष्ट्र सेनेचा प्रमुख धनंजय देसाई यांच्यासह या संघटनेच्या वीस जणांवर मोहसीनच्या हत्येचा आरोप होता. त्यावेळी फेसबुक आणि सोशल मीडियावर अज्ञात व्यक्तींकडून छत्रपती शिवाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह्य पोस्ट टाकण्यात आल्यानं तणाव निर्माण झाला होता. त्यावेळी धंनजय देसाईने त्याच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांसमोर चिथावणीखोर भाषण दिल्याने त्याच्या कार्यकर्त्यांनी मोहसीनची हत्या केल्याचा आरोप होता.

'शब्द जपून वापरा'

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे भाजपचे आहेत, असं वक्तव्य प्रकाश आंबेडकरांनी केलं होतं. यावर प्रतिक्रिया देताना शिवसेना खा. संजय राऊत यांनी शब्द जपून वापरा असे म्हणत प्रकाश आंबेडकरांचे कान टोचले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे महाविकास आघाडीतील प्रमुख पक्ष असून, त्यांच्याबाबत प्रकाश आंबेडकरांनी अशी वक्तव्य करणं आम्हाला मान्य नाही, असे राऊत म्हणाले. भूतकाळातील मतभेद आपल्याला दूर ठेवायला हवेत आणि भक्कम आघाडी उभा राहायला हवी, असेही संजय राऊत यावेळी म्हणाले.

'आंबा बागायतदारांची कर्जमुक्ती करा'

प्रजासत्ताकदिनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

कोकण हापूस आंबा उत्पादक आणि उत्पादक विक्रेते सह. संस्था मर्यादित यांच्यावतीने प्रजासत्ताकदिनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन करण्यात आले. आंबा बागायतदार अडचणीत सापडला असून, बदलत्या हवामानाचा फटका त्यांना बसत आहे. राज्य सरकारने आंबा बागायतदारांना कर्जमुक्ती देऊन सातबारा कोरा करावा आणि पुन्हा आंबा व्यवसायात उभे राहण्यासाठी नवीन कर्जत उपलब्ध करुन द्यावीत, अशी मागणी या आंदोलनात करण्यात आली.

आंबा, काजू, नारळ व सुपारी हे कोकणातील शेतकऱ्याचे मुख्य पीक

असून कोकणची अर्थव्यवस्था या पिकावर अवलंबून आहे. सन २०१५ पासून कोकणातील आंबा उत्पादन शेतकऱ्यांना प्रतिकूल, खराब हवामान, अवेळी पाऊस पडण, वादळीवारे, कोरोनासंकट व वाढीव वीज बिल या कारणांमुळे मोठा आर्थिक फटका बसत आहे. यंदाही वातावरणातील सतत होणाऱ्या बदलामुळे व सतत पडणाऱ्या पावसामुळे मोहोर अत्यल्प प्रमाणात आला असून, आता मोहर येण्याचा कालावधीही संपत आलेला आहे. नंतर मोहोर आला तर होणाऱ्या आंब्याला कवडीमोल भाव मिळतो. रायगड जिल्ह्यात सुमारे साडेबारा हजार हेक्टरवर आंबा बागायत आहे. सुमारे साडेआठ हजार आंबा बागायतदार आहेत. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात पीक विम्याचे दार कमी आहे. परंतु, रायगड जिल्ह्यात या दरात तफावत आहे. ही तफावत दूर केल्यास रायगड जिल्ह्यातील आंबा बागायतदारांना दिलासा मिळेल, असे कोकण हापूस आंबा उत्पादकांनी सांगितले.

या आहेत मागण्या

- आंबा, काजू, नारळ, सुपारी बागायतदारांची कर्ज सरसकट माफी करून ७/१२ कोरा करावा.
- नियमित असणाऱ्या कर्जदारांना त्यांनी व्यवसायात उभे राहण्यासाठी मिनी पॅकेज जाहीर करावे.
- शासनाने रायगड जिल्ह्यात कृषी संशोनासाठी प्रयोगशाळा स्थापना करावी.
- पीक विम्याचे निषक बदलून निकर्ष ठरविताना शेतकऱ्यांच्या संस्थेचा प्रतिनिधी घ्यावा.
- अवकाळी पावसाचा कालावधीत १ नोहेंबर ते ७ जूनपर्यंत असावा.
- खते, औषधे, पेट्रोल व रॉकेलच्या किंमती कमी करण्यात याव्यात.
- शेतकऱ्याने खरेदी केलेल्या बिलावर शासनाने अनुदान द्यावे.
- थकित शेतकऱ्यांची जप्तीची कारवाई थांबविण्यात यावी.
- लोकअदालतमधील प्रकरणांचे व्याज थांबवून रकमा भरण्यासाठी सवलती द्याव्यात.
- शून्य वीजचोरी असलेल्या कोकणात पूर्वीप्रमाणे शेतकऱ्यांना योग्य कृषी वीज बिले द्यावीत.
- आंबा हे पीक नाशिवंत माल असल्यामुळे या पिकाला हमीभाव मिळावा.
- कोकणातील आंब्यांचा माकडांमुळे होणाऱ्या नुकसानीचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा.
- वादळाच्या भरपाईपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना ती भरपाई त्वरित देण्यात यावी.

खालापूरमध्ये आज रंगणार कृषीवल हळदीकुंकू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

कृषीवलचे हळदीकुंकू म्हणजे महिलांचा मान, सौभाग्याचं दान, कर्तृत्वाचा सन्मान या उक्तीनुसार मालिकेतील तिसरा हळदीकुंकू सोहळा शनिवारी (२८ जानेवारी) खालापूर येथे दिमाखात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा होत आहे. या कार्यक्रमाची जोरदार तयारी कृषीवल परिवार आणि शेकाप महिला आघाडीच्यावतीने करण्यात आली आहे.

कृषीवलतर्फे रायगडात ठिकठिकाणी महिलांच्या सन्मानार्थ हळदीकुंकू सोहळे आयोजित केले जात आहेत. बुधवारी (१८ जानेवारी) अलिबाग येथे हळदीकुंकूचा पहिला सोहळा, त्यानंतर (२१ ●➤ पान २ वर

नराधमास अटक

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

अल्पवयीन मुलीला आंघोळ करीत असताना खिडकीतून डोकावून पाहण्याचे अश्लील कृत्य करणाऱ्या नराधमास पोक्सो कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे. श्रीवर्धन तालुक्यातील जसवली येथील ४३ वर्षीय नराधमाने मुलीच्या मनात लज्जा उत्पन्न करण्याचा प्रकार केला आहे. आरोपी गुरे चरविण्यासाठी जात असताना त्याने असभ्य वर्तन केले.

पोलिसांनी सदर नराधम आरोपीला ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रसेडे करीत आहेत.

कॉईलचोरी जीवावर बेतली; चोरटा जळून खाक

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील महाड-भोर-पंढरपूर रस्त्यावरील ईशाने कांबळे गावाजवळ पहाटेच्या सुमारास चालू प्रवाहातील ट्रान्सफॉर्मरमधील कॉइल चोरीच्या प्रयत्नात अज्ञात चोरट्याचा शॉक लागून संपूर्ण शरीराचा कोळसा होऊन मृत पावल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. याबाबत महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंधळे या घटनेचा तपास करीत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलादपूर तालुक्यात अनेक गावांत ट्रान्सफॉर्मरमधील कॉईल चोरी करणारी टोळी सक्रिय असून, त्याचा तापमान आजपर्यंत लागलेला नाही. त्याची पुनरावृत्ती महाड तालुक्यात होण्यास सुरुवात होण्याअगोदरच अज्ञात टोळीमधील एकाचा मृत्यू होण्याची घटना घडली आहे.

महाड-पंढरपूर रस्त्यावरील ईशाने कांबळे गावाजवळ रस्त्यावर असणाऱ्या ट्रान्सफॉर्मरमधील कॉइल चोरी करून पहाटेच्या सुमारास पशार होण्याच्या तयारीत असणाऱ्या अज्ञात टोळीमधील एकाचा शॉक लागून संपूर्ण शरीर काळे ठिक्कर होऊन मृत्यू पावल्याची घटना घडली आहे. याबाबत महाड एमआयडीसी पोलीस पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मारुती आंधळे व पोलादपूर तालुक्याचे विद्युत अभियंता यांच्या सहकार्याने पोलीस तपास चालू असून, अज्ञात व्यक्तीचे अद्याप नाव समजले नाही.

महाड व पोलादपूर ●➤ पान २ वर

शाळेचा दरवाजा फोडून साहित्य लंपास

अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

महाड, प्रतिनिधी

महाड तालुक्यातील किंजळोली बुद्रुक शाळेत अज्ञात चोरट्यांनी शाळेच्या दरवाजाचे कुलूप फोडून शाळेतील सुमारे ३० हजार रुपयांचे साहित्य लंपास केले असल्याची तक्रार शाळेच्या मुख्याध्यापकांनी महाड शहर पोलीस ठाण्यात केली आहे. महाड तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या किंजळोली बुद्रुक येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये २३/२४ जानेवारीदरम्यान झाली आहे. शाळेचे मुख्याध्यापक सुनील दत्तात्रय जंगम यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार २३ जानेवारीच्या ५ वाजल्यापासून ते २४ जानेवारीच्या ९.४५ दरम्यान अज्ञात चोरट्याने शाळेच्या दरवाजाचा कुलूप तोडून टीव्ही, साऊंड बॉक्स, दोन ॲम्प्लि फायर, कॉम्प्युटर मॉनिटर, दोन स्पीकर, एक स्टेबलायझर, दोन ब्लॅक बोर्ड असे सुमारे ३० हजारांचे साहित्य चोरून नेले. महाड शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल दाखल झाला असून, पुढील तपास पो.ना. एस.एस. बोटे करीत आहेत.

अरेच्चा! कोंबडीच्या पिल्लाला चार पाय

। महाड । ग्रामीण प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील लाडवली गावात चार पायाचे कोंबडीचे पिल्लू जन्माला आल्याने कुतुहलाचा विषय बनला आहे. निसर्गाचा चमत्कार पाहण्यास ग्रामस्थांची गर्दी होत असून, हे पिल्लू सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. सिद्धेश संतोष शिंदे यांच्या कोंबडीने चार पाय असलेल्या पिल्लाला जन्म दिला आहे.

लाडवली गावातील सिद्धेश शिंदे यांच्या एका कोंबडीने उबवलेल्या अंड्यात चार पायांच्या पिल्लाचा जन्म झाला आहे. हे पिल्लू पाहून शिंदे कुटुंबियांनाही आश्चर्याचा धक्का बसला आहे. या पिल्लाला पाहायला कुतूहलापोटी बघ्यांची गर्दी जमत आहे. दरम्यान, या

कोंबडीची आणि तिच्या पिल्लाची चर्चा संपूर्ण गावात रंगली आहे.

भूमिअभिलेख कार्यालयाला ध्वजारोहणाचा विसर

ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण

। म्हसळा । वार्ताहर ।

देशभर प्रजासत्ताकदिन साजरा होत असताना आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त घर घर तिरंगा फडकविण्यात आला असताना तालुक्यातील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाच्या इमारतीवर मात्र १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी सोडाच, पण २६ जानेवारी या प्रजासत्ताकदिनीसुद्धा ध्वजारोहण न केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव संतापाचे वातावरण आहे. सबंधित अधिकाऱ्यांवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे.

उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय म्हसळा या कार्यालयावर भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त गुरुवार, दि.२६ जानेवारी रोजी ध्वजारोहण केलेच नाही. शिवाय शासनाच्या 'घर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत १३ ते १५ ऑगस्टपर्यंत तीन दिवस देशातील प्रत्येक घर, शासकीय

व निमशासकीय तसेच खाजगी आस्थापना यांना ध्वजारोहण करण्याचे अवगत केले होते. मात्र असे असताना उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयाने एकही दिवस ध्वजारोहण न करता शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत राष्ट्राप्रती आपली किती निष्ठा आहे, हे प्रदर्शीत केले आहे. स्वतःच्या जागेत सुमारे ५० लाख शासकीय निधी खर्च करून बांधलेल्या शासकीय इमारतीवर झेंडा न फडकविणे हा राष्ट्रद्रोहाचा गुन्हा ठरणे आवश्यक आहे, अशी आग्रही मागणी जनतेची आहे.

उपअधीक्षकभूमिअभिलेखश्री. कातडे यांच्याशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधला असता, या कार्यालयाची ●➤ पान २ वर

> राज्यात प्रजासत्ताक दिन निर्धोकपणे राष्ट्रीयसण म्हणून साजरा करीत असताना म्हसळा तालुक्यातील वर्ग १चा शासकीय अधिकारी ध्वजारोहण करीत नाही, हे राष्ट्रद्रोही कृत्य आहे, असून त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे.
> – महादेव पाटील, माजी सभापती तथा अध्यक्ष, म्हसळा तालुका हिंदू ग्रामस्थ समाज

उल्हास नदीत 'लब्धी'चे सांडपाणी

ग्रामस्थांकडून संताप व्यक्त

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील नेरळ दहिवली येथील उल्हास नदीच्या काठावर उभारण्यात येणाऱ्या लब्धी गार्डनचे सांडपाणी थेट नदी पत्रात सोडण्यात येत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे केल्या होत्या. त्यावर निर्वाचित सरपंच मेघा अमर मिसाळ, ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी थेट नदी पत्रात जाऊन पाहणी केली. त्यानंतर पाईपाद्वारे सांडपाणी थेट नदी पत्रात सोडण्यात येत असल्याचे दिसून आले. सांडपाण्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येणार असल्याने सरपंच, सदस्य आणि ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

उल्हास नदी बचाव ग्रुप च्या माध्यमातून दहीवली येथील उल्हास नदिलगत सुरू असलेल्या लब्धी गार्डन्स या गृह प्रकल्पातून जो सांडपाण्याचा निचरा होत आहे तो थेट नदी पात्रात होत असून याबाबत अनेक वेळा तक्रारी केलेल्या आहेत आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल दिलेला आहे. २६ जानेवारी रोजी बाबत ग्रामपंचायत मध्ये ग्राम सभेत मुद्दा उपस्थित केल्यानंतर उपस्थित सर्व नागरिक, सदस्य, सरपंच यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता आजही नदी पात्रात सांडपाणी जात असल्याचे निदर्शनास आले. याप्रसंगी सरपंच मेघा अमर मिसाळ, उपसरपंच आदेश एकनाथ धुळे, पंचायत समिती सदस्य अमर मिसाळ, सदस्य नरेश कालेकर, सोनम बंधू गायकवाड, पिंटू भवारे यांच्यासह भास्कर तरे, जनार्दन तरे, ड.पंकज तरे, सतीश कालेकर व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

उल्हास नदीपत्रात सोडलेल्या सांडपाण्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येणार आल्याने हे पाणी थांबले नाही तर बिल्डरविरोधात आंदोलन करण्याचा इशारादेखील ग्रामस्थांनी दिला आहे.

> प्रत्यक्ष पाहणी केली असता एकंदर लब्धी गार्डन्स या गृहप्रकल्प व्यावसायिक येथील नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असून, हा प्रकार अतिशय गंभीर आहे. याबाबत ग्राम पंचायत जाब विचारणार असून, पाण्याचा निचरा त्वरित थांबला पाहिजे अन्यथा बिल्डरवर कठोर कारवाई केली जाईल.
> – मेघा मिसाळ
> सरपंच, दहिवली ग्रामपंचायत

> नियमानुसार सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पातील पाणी बाहेर कुठेही जाता कामा नये परंतु आजही नदी पात्रात पाणी सर्रास सोडले जात आहे. त्यामुळे याबाबत त्वरित तहसील, जिल्हाधिकारी आणि प्रदूषण मंडळास याबाबत लेखी तक्रार करून याबाबत ऑडिट करण्याची मागणी करणार आहोत. हा प्रकार त्वरित थांबला नाही तर मोठे आंदोलन छेडले जाईल.
> – केशव तरे,
> उल्हास नदी बचाव ग्रुप प्रमुख

खोपटा पुलावर अनधिकृत ट्रेलर पार्किंग

। उरण । वार्ताहर ।

रस्त्यावरील पार्किंगमुळे वाहतूक कोंडीच्या समस्या उद्भवत असताना आता खोपटा बांधपाडा हद्दीत असणाऱ्या मास्टर मरीन यार्डसुद्धा वाहतूक कोंडीस कमी पडत नसल्याचे खोपटा पुलावर पार्किंग करून ठेवलेल्या कंटेनरच्या लांबच लांब रांगेवरून दिसून येत आहे.

खोपटा पुलाजवळ मास्टर मरीन हे एमटी कंटेनर साठवणूक करून ठेवणारे यार्ड आहे. या यार्डमध्ये सध्या रिफर कंटेनर ठेवले जात आहेत. यार्ड मालक यार्डमध्ये जागा नसतानाही कंटेनर मागविले जात आहे. कंटेनर यार्डमध्ये कंटेनर ट्रेलर पार्किंगला जागा नसल्यामुळे कंटेनर ट्रेलर हे रस्त्यावरच उभे केले जात असून, त्यांच्या रांगा खोपटा पुलापर्यंत पोहचल्या आहेत.त्यामुळे वाहतूकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे.

वाहतुकीस अडथळा

या पार्किंगमुळे अनेक समस्याही उद्भव आहेत.

उरण तालुक्यात असे अनेक कंटेनर यार्ड आणि गोदामे आहेत. त्यांच्याकडे वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे हे कंटेनर चालक बेकायदेशीरपणे ही वाहने रस्त्यावर उभी करून वाहतुकीला अडथळा निर्माण करतात. मात्र, या संबंधित असणारी यंत्रणा याकडे डोळेझाकपणा करीत असल्याने अनेक समस्या उद्भवतात. वाहतूक कोंडी होते आणि या वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना निष्पाप दुचाकीस्वारांचा अपघात झाल्याच्या अनेक घटना होऊन त्यामध्ये अनेकांचे बळीही गेले आहेत. त्यामुळे या रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या वाहनांवर आणि कंटेनर यार्ड मालकांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी नागरिकांकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात वाहतूक विभागाचे वाहतूक पोलीस निरीक्षक अशोक गायकवाड यांच्यशी संपर्क केला असता होऊ शकला नाही.

चुकीच्या वारसनोंदीच्या निषेधार्थ आमरण उपोषण

। उरण । वार्ताहर ।

कोंकण विभागीय आयुक्त तथा जिल्हाधिकारी रायगड डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या आदेशाने मंडळ अधिकारी आणि तहसीलदार उरण यांनी नोंद चुकीच्या पद्धतीने झाल्याने सदर फेरफार रद्द करण्यात यावा, असा स्पष्ट अहवाल दिलेला असूनही उपविभागीय अधिकारी पनवेल आणि महसूलमंत्री यांनी आदिवासी महिलेवर अन्यायकारक निर्णय दिलेला आहे. त्या निषेधार्थ प्रजासत्ताकदिनी प्रांत अधिकारी कार्यालय पनवेल येथे मुक्ता कातकरी ही आमरण उपोषणाला बसली आहे. अनेक संघटना हे उपोषण स्थळी येऊन सदर उपोषणास पाठिंबा देत आहेत.

दिघोडे तालुका उरण येथील सर्व्हे नंबर ९४/८ आणि १००/१ ही पाच एकर जमिनीच्या सात बारा सदरी गोपाळ लहाण्या कातकरी ह्या आदिवासी व्यक्तीची नोंद होती. त्याच्या मृत्यूनंतर महसूल अधिकारी आणि कर्मचारी यांनी घरत कुटुंबियांशी संगनमत करून चुकीच्या पद्धतीने वारस म्हणून घरत कुटुंबियांची नावे सात बारा सदारी दाखल केली. कातकरी आडनाव असलेल्या आदिवासी व्यक्तीचे वारस म्हणून आगरी समाजातील घरत आडनाव असलेल्या व्यक्तीची वारस म्हणून कशी नोंद होवू शकते, हा मूळ मुद्दा आहे. त्या निषेधार्थ मुक्ता कातकरी ही आमरण उपोषणाला बसली आहे.

पोलिसांचे ऑपरेशन ऑलआऊट

। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा पोलीस ठाण्याचे स. पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि विविध प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी सावधगिरी बाळगावी म्हणून ऑलआऊट ऑपरेशन मोहीम राबविण्यात आली. यावेळी विविध प्रकारच्या १५ गुन्हांची तपासणी केली. तपासणी मोहिमेत म्हसळा पोलिसांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११ मोटार वाहनांवर कारवाई करून ५५०० रुपये आणि ६ कोपटा केस कारवाईत १२०० रुपयांचा दंड मिळून ६७०० रुपयांचा दंड वसूल केला, अशी माहिती संदीपान सोनवणे यांनी दिली.

श्रीवर्धन येथे राष्ट्रीय मतदार दिन साजरा

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

नागरिकांमधे मतदानाबद्दल व नवमतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा या दृष्टीने दरवर्षी २५ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता श्रीवर्धन येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवनाच्या सभागृहात तेरावा राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला गेला. तहसीलदार सचिन गोसावी यांच्यासह ॲड. आशिष वढावकर, ॲड. मंदार ठोसर, ॲड. विठोबा पाटील, ॲड. संजीव डेगवेकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धनचे अधिकारी डॉ. सिध्देश सावंत, मंडल अधिकारी कल्याण देऊळगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. संतोष सापटे यांनी केले.

दारूविरुद्ध धडक कारवाई

। कोलाड । प्रतिनिधी ।0

गोवे ग्रामपंचायत हद्दीत अवैध दारू विक्रीबाबत विक्रेत्यांना वारंवार सूचना करूनदेखील दारू विक्री बंद होत नसल्याची तक्रार कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या निवेदनाची दखल घेत सपोनि अजित साबळे यांनी सापळा रचून मुठवली बु बौध्दवाडी गावाच्या हद्दीतील दारू धंद्यावर पोलिसांनी कारवाई केली. तर गोवे येथील दारू विक्रेताही पोलिसांच्या रडावर असल्याचे बोले जात आहे.

गोवे, मुठवली गावात राजरोसपणे अवैध गावठी दारू विक्री होत असल्याने याविरोधात ग्रामस्थ, महिलांनी २६ जानेवारी रोजी उपोषणाला बसणार असल्याचे निवेदन कोलाड पोलिसांना दिले होते. या निवेदनाची तातडीने दाखल घेत कोलाड पोलीस सपोनि अजित साबळे यांनी सापळा रचून कारवाई केली आहे.

माणगाव पोस्ट ऑफिस राज्यात अव्वल

सर्वाधिक २६६६ खाती उघडून प्रथम स्थान

। माणगाव । प्रतिनिधी ।

भारतीय डाक विभागाने संपूर्ण भारतभर सप्टेंबर २०२२ मध्ये नवीन खाते उघडणे अभियान राबवण्यात आले होते. रायगड विभागात भारतीय डाक अधीक्षक डॉ. संजय लिये यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोस्ट ऑफिसने २६६१ खाते उघडून महाराष्ट्र डाक सर्कलमध्ये प्रथम स्थान प्राप्त केले आहे. डाक विभागाकडून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन माणगाव पोस्ट ऑफिसला गौरविण्यात आले आहे.

अभियान यशस्वी करण्याकरता माणगाव उपविभागीय डाक निरीक्षक धनराज उमाळे यांच्यासह पोस्ट मास्तर शिलवंत यांचे नियोजनपूर्ण मार्गदर्शन लाभले. याबाबतीत डाक सहाय्यक श्रीनिवास येरावार, विशाल भोपळे, सुबोध कासारे, केशव मनवल, सत्यजित साहू यांच्यासह पोस्टमन राजेंद्र कदम, प्रशांत जूमारे, चंद्रकांत सपकाळ, सागर भोरावकर, नंदकुमार शिंदे यांचे सहकार्य लाभले तसेच डाक आवेक्षक संजय पालकर व किशोर नाडकर यांचे सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे नंदकुमार जोशी, डाक प्रतिनिधी मीरा मेहता, डाकसेवक सुनील लहाने व सर्व शाखा घरातील कर्मचारी वर्गाने विशेष सहकार्य केले.

माणगाव पोस्ट ऑफिसमध्ये टपाल जीवन विमा, सुकन्या समृद्धी योजना ,किसान विकास पत्र, राष्ट्रीय बचत पत्र, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, आधार नोंदणी केंद्र यासारख्या विविध योजनांचा लाभ भेटत आहे. सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी माणगाव पोस्ट ऑफिसशी संपर्क साधावा असे आवाहन माणगाव पोस्ट ऑफिसचे पोस्ट मास्तर शिलवंत यांनी केले आहे.

कोरमअभावी ग्रामसभा तहकूब

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेल्या ग्रामसभेला ग्रामस्थांनी दांडी मारली. त्यामुळे नेरळ ग्रामसभेची ग्रामसभा तहकूब करावी लागली.

प्रजासत्ताक दिनाचे निमित्ताने दरवर्षी ग्रामसभा आयोजित केल्या जातात आणि सर्व ग्रामस्थ यांना ग्रामपंचायतमधील प्रशासन याविरुद्ध थेट बोलण्याची संधी मिळत असते. मात्र २६ जानेवारी रोजी आयोजित केलेली ग्रामसभा हीमात्र ग्रामस्थ आले नसल्याने तहकूब करावी लागली. त्याचे एक कारण कोकण शिक्षक मतदारसंघाची सुरु असलेली निवडणूक आचारसंहिता हे देखील असूशकते. आचारसंहिता असल्याने कदाचित स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामसभेकडे पाठ फिरवली असू शकते. या ग्रामसभेला सरपंच आणि अध्यक्ष उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर, ग्रामसभेच्या सचिव ग्रामविकास अधिकारी गणेश गायकर यांच्यासह जेमतेम २० ग्रामस्थांच्या सह्या या ग्रामसभेच्या रजिस्टरवर झाल्या होत्या. त्यामुळे सचिव गायकर यांनी कोरमअभावी राष्ट्रगीत होऊन सभा तहकूब करीत असल्याचे जाहीर केले.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१

सुनावणीची नोटीस

जा.क्र.सनि/४९३/वि-१/१०१
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पेण यांचे कार्यालय
दिनांक २३/०१/२०२३

रजिस्टर पोहोच पावतीसह
प्रति. दावा क्र.
.....
रजिस्टेशन नं. आरजीडी/पीईएन/आरएसआर/सी.आर. सन..
पत्ता .....
तर्फे व्यवस्थापक/अधिकृत अधिकारी
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग शाखा पेण
विरुद्ध
कर्जदार १. श्री. घनश्याम मधुकर समेल
मु.कासार पेण, ता. पेण,जिल्हा-रायगड
जामीनदार
२.श्री. महेश रविंद्र वडके
पत्ता: मु. कासार आळी पेण, ता. पेण, जिल्हा रायगड.
३. श्री. अविनाश महादेव पाटील
पत्ता.मु.पेझारी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि.रायगड
कर्जदार १.श्री. देवेन अरुण यादव
पत्ता-मु.२ मजला कौशल्य हिल प्लॉट नं. १६२ वरसोली, ता. मावळ, जिल्हा-पुणे.
जामीनदार-
२. श्री. विजयकुमार रतनचंद जव्हेरी
पत्ता.मु.ए.७०४ पार्क टिटॅनियम पार्क वाकड जि. पुणे ४११०५७
३.श्री. वैभव विलास थोरवे पत्ता.मु.पो.पोसरी, ता. कर्जत, जि.रायगड
कर्जदार
१.श्री.सुरज अशोक म्हात्रे पत्ता.मु.उचेडे, पो. कांडळेपाडा, ता. पेण, जि.रायगड
जामीनदार
२.श्री. दत्तात्रेय शांताराम पाटील पत्ता मु.पो.पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड
३. श्री. विनय बाळकृष्ण शिपाई पत्ता. मु.भेरसे, पो. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड
कर्जदार
१.सौ. मंदाकिनी राजेश पाटील पत्ता-मु.रोडे, पो.कांदळेपाडा, ता. पेण, जि.रायगड
२. श्री. राजेश जनार्दन पाटील पत्ता. मु.रोडे, पो. कांदळेपाडा, ता. पेण, जि. रायगड
जामीनदार
३.श्री. प्रकाश धाऊ जाधव पत्ता.मु. बुद्धनगर,ता.पेण, जि. रायगड
४.श्री. महेश जनार्दन ठाकूर पत्ता.मु.ओढांगी, पो. वाशी, ता. पेण, जि.रायगड
कर्जदार
१.श्रीम. रंजना शरद पाटील पत्ता.मु.पो.गडब, ता. पेण. जि.रायगड
जामीनदार
२.श्री. राजेंद्र गोपाळ म्हात्रे पत्ता. मु.पो.गडब, ता. पेण, जि. रायगड
३.श्री. देविदास रामचंद्र शिर्के पत्ता. मु.पो.गडब, ता. पेण, जि.रायगड
कर्जदार
१.श्री. नरेंद्र गोविंद भोईर पत्ता-मु.कोपर, पो.जोहे, ता. पेण, जि. रायगड.
जामीनदार
२.श्री. प्रदीप सुर्याजी म्हात्रे पत्ता.मु.पो.हमरापूर, ता. पेण, जि. रायगड
३.श्री. परशुराम मारुती पाटील पत्ता. मु.उर्नोली, पो. पालखार, ता. पेण, जि. रायगड
विषय : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० वसुली दावा दाखला देणेबाबत
संदर्भ १) या कार्यालयाचे जा.नं.सानिपे वि१/१०१/दाव नोटीस/दिनांक २१-१२-२०२२ ची नोटीस
२) या कार्यालयाचे जा.नं.सानिपे वि १/१०१/दाव नोटीस/दिनांक ०५-०१-२०२३ ची नोटीस

वरील सुनावणीचे वेळी आपण गैरहजर होतात. त्यामुळे उपरोक्त अर्जाची अंतिम सुनावणी मा. सहाय्यक निबंधक सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पेण यांच्या कार्यालयात दिनांक ०२-०२-२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आली असून आपण स्वत: सुनावणीस हजर रहावे व अर्जदार बँकेने दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे समक्ष मांडावे. उपरोक्त दिवशी आपण गैरहजर राहिल्यास त्याबाबत आपले काहीही म्हणणे नाही. असे गृहित धरुन अर्जाची चौकशी पूर्ण करण्यात येवून अंतिम निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था
पेण, जि. रायगड

पान १ वरून

अलिबागमध्ये मिळणार पासपोर्ट

व त्यांना पासपोर्टसंदर्भातील आपली कामे सुलभरित्या पार पाडता यावीत, या उद्देशाने आ. जयंत पाटील यांनी नितीन गडकरी यांच्याकडे अलिबागमध्ये पासपोर्ट कार्यालय सुरु करण्याची मागणी केली होती.

रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना पासपोर्ट काढण्यासाठी ठाणे हे एकमेव कार्यालय आहे. यामुळे पोलादपूरच्या टोकापासून ते अलिबागच्या नागरिकांना पासपोर्ट काढण्याच्या प्रक्रियेसाठी बरीच धावपळ करावी लागते. काही त्रुटी निघाल्यास पुन्हा ठाण्याला जाण्याची वेळ येते. त्यामुळे नागरिकांची गैरसोय थांबावी, या उद्देशाने आ. जयंत पाटील यांनी हा प्रश्न उचलून धरला. त्यांच्या मागणीची दखल घेत सदर कार्यालय अलिबागमध्ये होण्यास मंजुरी मिळाली असून, त्यादृष्टीने अलिबाग येथील पोस्टाच्या इमारतीत विस्तारीकरणास सुरुवात झाली असून, कामाला वेग आला आहे. आवश्यक त्या दुरुस्ती झाल्यानंतर दोन महिन्यांत सदर कार्यालय सुरु होणार असल्याची माहिती पोस्ट ऑफिसच्या सूत्रांनी दिली.

मुख्यमंत्री खोटारडे

कार्यालयावर अंगणवाडी कर्मचारी मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनानुसार, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करुन शासकीय वेतनश्रेणी, भत्ते, सेवेचे सर्व फायदे देणे व सर्वोच्च न्यायालयाच्या एसएलपीच्या निर्णयानुसार ग्रॅच्युईटी पूर्वलक्षीप्रभावाने देण्यात यावी. ही मागणी मान्य होईपर्यंत अंगणवाडी मदतनिसांना दरमहा १८ हजार रुपये व सेविकांना व मिनी अंगणवाडी सेविकांना दरमहा २० हजार रुपये वेतन देण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी आंदोलक महिला आक्रमक झाल्या होत्या. त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत मुख्यमंत्री खोटारडे असल्याचा आरोपदेखील केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थमंत्री यांचा जोरदार निषेध करीत ङ्गया खोटारड्या सरकारचे करायचे काय, खाली डोके वर पायफ अशा घोषणा देण्यात येत होत्या. तीन जानेवारी रोजीच्या आझाद मैदानावरील आंदोलनादरम्यान मुख्यमंत्र्यांनी २५ जानेवारीला मानधन वाढ करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यांनी ते न पाळल्याने यापुढे आंदोलन अधिक तीव्र करीत शासनाला त्यांची जागा दाखविण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

या आंदोलनात प्रतिभा म्हात्रे, जिवीता पाटील, प्रणिता कांबळे, निलम नागवेकर, सुरक्षा वाळंज, दीक्षा कर्णेकर, श्रद्धा राऊत, आरती कंटक, स्नेहा कवळे, नेहा मानकर, जयश्री पाटील, मधुमती कर्णिक आदींसह शेकडो अंगणवाडी सेविका सहभागी झाल्या होत्या.

खालापूरमध्ये आज रंगणार कृषीवल हळदीकुंकू

जानेवारी) पालीमध्ये दुसरा सोहळा पार पडला. आता शनिवारी खालापूर येथील खालापूर फाटा मैदान, श्री कृष्ण पेट्रोलपंजपाजवळ सायंकाळी ४ ते ७ दरम्यान हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास सोनी मराठी वाहिनीवरील विविध मालिकांमध्ये भूमिका साकारणारे कलावंतांबरोबरच आपल्या लावणीने रायगडकरांच्या मनावर अधिराज्य करणारी सोनाली पवार प्रत्यक्ष खालापुरातील महिलांच्या भेटीला येऊन त्यांचा आनंद द्विगुणीत करणार आहेत. हळदीकुंकू सोहळ्यात महिलांना सौभाग्याचे वाण लुटण्याची संधी शेकापच्या महिला जिल्हा आघाडीप्रमुख तथा कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालक चित्रलेखा पाटील यांनी प्राप्त करुन दिली आहे.

या हळदीकुंकू कार्यक्रमास सोनी मराठी वाहिनीवरील प्रसिद्ध जीवाची होतिया काहिली फेम श्रुतकिर्ती सावंत त्याचप्रमाणे आशीर्वाद तुझा एकवीरा आई फेम अमृता पवार व अन्य कलाकार उपस्थित राहणार आहेत. यावेळी सोनाली पवार हिचा लावणीचा लाईव्ह परफॉर्मन्स पाहायला मिळणार आहे. या कार्यक्रमामुळे महिलांना एक वेगळीच पर्वणी मिळणार आहे. विक्रमावर विक्रम करणारा हा सोहळा म्हणजे खालापूर तालुक्यातील महिलांना सौभाग्याचे लेणे आणि साजशृंगार करण्यासाठी एक उत्सवच बनू पाहात आहे.

कॉईलचोरी जीवावर बेतली; चोरटा जळून खाक

तालुक्यात गावोगावी ट्रान्सफार्मरमधील कॉइल चोरीच्या घटना वाढत चालल्या असताना आज ईशाने कांबळे गावाजवळ झालेल्या घटनेमुळे अज्ञात टोळीचा तपास लागण्यास यामुळे मदत होणार असल्याची समजते.

भूमिअभिलेख कार्यालयाला ध्वजारोहणाचा विसर

स्वतंत्र इमारत झाल्यापासून २६ जाने. (प्रजासत्ताक दिन), १ मे (महाराष्ट्र दिन) आणि १५ ऑगस्ट (स्वातंत्र्यदिन) या तीनही राष्ट्रीय सणाला आमच्या कार्यालयाची ध्वजारोहणाची परंपरा नाही, असे स्पष्ट सांगितले.

वाहतूक कोंडीबाबत चर्चा

। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा शहराला पर्यायी मार्ग व्यवस्था होऊनही दिघी-पुणे राष्ट्रीय मार्गावरील सकलप - तोंडसुरे पर्यायी मार्गाचे काम रखडले आहे. दिघी, बोर्ली, दिवेआगरकडे जाणारी सर्वच प्रकारची वाहने म्हसळा शहर नाक्यावरून रहदारी करीत असल्याने ट्रॅफिक जॅमची समस्या आजही जैसी थे आहे. शहरामधून एसटीसह सर्वच अवजड वाहनांना प्रवेशबंदी करूनही वाहतूक कोंडी समस्या वाढतच असल्याने होणारी कोंडी कमी करण्यासाठी म्हसळा पोलीस ठाणे येथे पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी शहरातील रिक्षा चालक मालक संघटनेची बैठक घेऊन संवाद साधला. यावेळी श्री. सोनावणे यांनी वाहतुकीचे नियमांबाबत व वाहतुकीची कोंडी होणार नाही याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले. या बैठकीसाठी शहरातील रिक्षा चालक मालक संघटनेचे बहुतांश सभासद उपस्थित होते.

नवी मुंबई

श्रीवर्धन येथे ध्वजारोहण

श्रीवर्धन : येथे उपविभागीय अधिकारी अमित शेडगे यांच्या हस्ते मध्यवर्ती प्रशासकीय भवनाच्या प्रांगणात, तर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तहसीलदार सचिन गोसावी व रानवली ग्रामपंचायत मैदानात माजी सदस्य राजू लक्ष्मण जाधव यांच्या हस्ते रानवली ग्रामपंचायतीत ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्यास सरपंच सुरेश मांडवकर, उपसरपंच अताउल्ला जालगावकर उपस्थित होते.

विविध प्रात्यक्षिकांचे सादरीकरण

उरण : तालुक्यातील चिरनेरमधील पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या पी.डी. खारपाटील मराठी माध्यम शाळा व ठकुबाई खारपाटी इंग्रजी माध्यम शाळा या संकुलात उत्साह पूर्ण वातावरणामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी इंग्रजी व मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके सादर करून आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष पी.पी. खारपाटील उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, सचिव समीर खारपाटील, अर्चना ठाकूर, वर्षा खारपाटील व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

आंबेत परिसरात ध्वजवंदन

आंबेत : आंबेत ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक मराठी व उर्दू शाळा, पोलीस दूरक्षेत्र, डाक घर, स्टेट बँक ऑफ इंडिया,अमृत तलाव आंबेत, नंतर अखेरीस सावित्री माध्यमिक विद्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला व प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रथमच आंबेत ग्रामपंचायत हद्दीतील सर्व शाळांचा एकत्रितपणे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

वेणगाव येथे ध्वजारोहण

वेणगाव : वेणगाव येथे नवनिर्वाचित सरपंच अश्विनी मंगेश पालकर यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयासमोरील व रायगड जिल्हा परिषद शाळा मोठे वेणगाव येथील ध्वजारोहण करण्यात आले. तत्पूर्वी, संपूर्ण गावातून जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य अभिषेक गायकर, भीमाबाई वाघमारे, प्रिय रातांबे, दिनेश गायकवाड, समीर पेठे, जागृती अंकुश सावंत, मुख्याध्यापक हरीचंद्र जाधव आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

सुरक्षा जवानांकडून लक्षवेधी परेड

रसायनी : रसायनीतील मोहोपाडा येथे सेबीचे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट (एनआयएसएम) येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण एनआयएसएमचे डायरेक्टर सिकेजी नायर यांच्या हस्ते करण्यात आले. याअगोदर परेड नेतृत्व सर्जेराव शिवाजी धामणे आणि महाराष्ट्र सुरक्षा बळाचे सुरक्षा जवान यांनी कॅरेमोनियल परेड केले. हे परेड पाहण्यासाठी रसायनी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

जिल्हाभर भारतमातेचा जयघोष

संपूर्ण जिल्हाभर गुरुवारी भारताचा प्रजासत्ताकदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ध्वजारोहण होताच मानवंदना देत भारतमातेचे गीत आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. दरम्यान, अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पीएनपीत वीरमाता, वीरपत्नीचा सन्मान

(छायाचित्र : अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पीएनपी वेश्वी संकुल येथील प्रांगणात संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत शहीद जवान जनरल निलेश तुणतुणे यांच्या वीरमाता श्रीमती निर्मला तुणतुणे आणि शहीद जवान जनरल तुकाराम सकपाळ कुटुंबियांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी राष्ट्रगीत, देशभक्तीपर गीत तसेच विद्यार्थ्यांनी परेड संचलन आणि प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.

वीरमाता निर्मला तुणतुणे आणि शहीद जवान जनरल तुकाराम सकपाळ या कुटुंबियांना सन्मानपत्र आणि मायेची शाल देऊन संस्थेच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

यावेळी बी.एड कॉलेजचे प्राचार्य नितेश मोरे, कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अलिबाग शाखा अध्यक्षा शुभांगी जोगळेकर, सुरेखा पाटील, सुभाष पानस्कर, सरोज पानस्कर, सुप्रिया जेधे, इतर मान्यवर आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पदाधिकारी, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ रायगड जिल्हा परिषद येथे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

■ पोलीस परेड मैदानावर जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांच्यासमवेत जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे उपस्थित होते.

■ कळंबोली पोलीस मुख्यालय परेड मैदानात कोकण आयुक्त महेंद्र कल्याणकार यांच्या हस्ते ध्वजारोहण उत्साहात संपन्न झाले. (छायाचित्र : राजेश डांगळे)

माजी सैनिक, वीरपत्नींचा सन्मान

। तळा । वार्ताहर ।

तळा नगरपंचायत प्रांगणात नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर यांच्या हस्ते तर तहसीलच्या समोरील प्रांगणात तहसीलदार ए. एम.कनशेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी तहसीलदारांच्या दालनात तालुक्यातील माजी सैनिक व वीर पत्नीना तहसीलदार ए. एम.कनशेट्टी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले तसेच विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे देखील आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शासकीय अधिकारी, तालुक्यातील विविध पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, प्रतिष्ठित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

। मुरूड । प्रतिनिधी ।

मुरुड शहरात सकाळी ७.३० वाजता शासकीय, निमशासकीय, पोलिस ठाणे, बॅका, नगरपरिषद शाळा, हायस्कूल व विद्यालये यांचा ध्वजारोहण संपन्न झाला. मुरूड नगरपरिषदेच्या प्रांगणात प्रशासक अधिकारी पंकज भुसे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर बाजारपेठेतील आझाद चौकात सकाळी ८.१५ वाजता मुरुड प्रशासक अधिकारी पंकज भुसे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. शेवटी ९.१५ वाजता मुरुड तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या ध्वजारोहण कार्यक्रमप्रसंगी तहसीलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

आझाद चौकात झेंडावंदन

ना.ना. पाटील संकुलात ध्वजारोहण

। पेझारी । वार्ताहर ।

को.ए.सो.च्या ना.ना. पाटील संकुल पोयनाड येथे प्रजासत्ताकदिनानिमित्त ज्येष्ठ संचालक पंडित पाटील अध्यक्षतेखाली आंबेपूर सरपंच सुमना पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी जि.प. माजी सदस्या भावना पाटील, युवा नेते सुप्रभात पाटील, शाळा समिती सदस्य यशवंत पाटील, स्वप्निल पाटील, को.ए.सो सह मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक गावडे, के.डी. म्हात्रे, सुरेश म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, संकुल प्रमुख फडतरे, कमलाकर फडतरे डॉ. दिलीप पाटील, एस.के. पाटील, तृप्ती पिळवणकर, प्रसन्ना राठोड, पोयनाड विभाग ग्रामपंचायतीचे आजी माजी सरपंच, सदस्य, कर्मचारी, प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्यकर्ते, संकुलातील सर्व शाखांचे प्रमुख, सर्व आजी माजी शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, माता-पिता पालक वर्ग असा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. शेवटी वंदे मातरम् या मंगल कामनेसह सर्व उपस्थितांना खाऊचे वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

दरम्यान, संगीत पथकाने राजेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रगीत, ध्वजप्रतिज्ञा, ध्वजगीत आणि देशभक्तीपर गीते सादर केली. यानंतर मान्यवरांनी एनसीसी, आर एस पी, गाईड पथकांच्या संचलनाचे निरीक्षण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली पाटील यांनी केले.

■ चौलमळा येथील राजिप मराठी शाळेत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रजासत्ताकदिनाचा उत्साह

माथेरान : माथेरानमध्ये गावातील ध्वजारोहण पार पडल्यावर अधीक्षक कार्यालय येथील ध्वजारोहण सव्वानऊ वाजता अधीक्षक तथा तहसीलदार दीक्षांत देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर नगरपरिषदेच्या आवारात मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. असेंब्ली हॉल येथे जेष्ठ नागरिक हरीभाई मेहता यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. यावेळी नगरपरिषदेच्या कर्मचारी वर्गासह गावातील मुख्य राजकीय पक्षाच्या व्यक्ती, कार्यकर्ते, विविध संस्थेच्या पदाधिकारी त्याचबरोबर नागरीक, शालेय विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

पथनाट्यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम

पेण तालुक्यात प्रजासत्ताक दिन उत्साहात

। पेण । प्रतिनिधी ।
पेण तहसील कार्यालयाचे ध्वजारोहण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी स्थानिक आमदार रविशेठ पाटील, तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे उपस्थित होते. तर पेण नगरपालिकेचे ध्वजारोहह मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या हस्ते झाले. नगरपालिकेच्या ध्वजारोहणासाठी माजी नगराध्यक्षा, नगरसेवक उपस्थित होते. तर तहसिल कार्यालयातील ध्वजारोहणासाठी पेण तालुक्यातील राजकीय पक्षांचे पुढारी कार्यकर्ते तसेच शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

पेणएज्युकेशनसोसायटीच्यासौ.म.ना. नेने कन्याविद्यालयाच्या पटांगणावर शालेय व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी परेड, देशभक्तीपर गीतांचे गायन, नृत्य, लेझीम, सुर्यनमस्कार, ट्राफिक सिग्नल रुल, डी. एल.एल.ई. युनिट च्या विद्यार्थ्यांनी डॉ. देविदास बाम्हणे यांनी लिहिलेले ''चुनाव में मतदान का अपना अधिकार'' या विषयावर पथनाटय सादरीकरण केले.

महात्मा गांधी स्मारक संस्था व महात्मा गांधी ग्रंथालय व वाचनालयाचे अध्यक्ष अरविंद गणपत वनगे तथा अण्णा वनगे यांनी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सावित्रीची लेक डॉ. नेत्रा ज्योत्स्ना नरेश पाटील (एम.बी.बी.एस) यांच्या हस्ते ध्वजारोहण करून घेतला.

गांधी मंदिर येथील ध्वजारोहनाला मोठया संख्येने पेण येथील विविध क्षेत्रातील मंडळी जमली होती. या कार्यक्रमासाठी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी गांधी वाचनालयाच्या पटांगणावर उपस्थित होते. आप्पा सत्वे, अशोक देसाई, सपना पाटील, अनघा सावंत, मोहिनी गोरे, पारिजात वनगे हे गांधी मंदीर सदस्य तर इतर मान्यवरांमध्ये पेणचे माजी नगराध्यक्ष संतोष श्रृगांरपुरे, नगरसेवक पांडूरंग जाधव, प्रतिभा जाधव, राजू वारकर, मंगेश पेडामकर, शोमेर पेणकर, संतोष पाटील, कृष्णा आवास्कर, नरेंद्र पाटील, हिमांशू कोठारी, विजय शहा, मिहीर धारकर, संदीप सुर्वे, तसेच गांधी वाचनालयाचे सर्व वाचक सभासद आदिंसह मोठया संख्येने पेणचे नागरिक हजर होते.

निगडावाडी शाळेत विविध कार्यक्रम

कर्जत : रायगड जिह्यातील पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निगडावाडी येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण राजीव मोहन पाटकर यांच्या हस्ते करण्यात आले. विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमानंतर राजीव पाटकर यांनी आपले वडील अशोकचक्र विजेते वायुदल कॅप्टन मोहन शांताराम पाटकर यांच्या समरणार्थ खाऊंचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक भास्कर शेगर, उपशिक्षक हरिश्चंद्र पाटील आणि निगडावाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

बुडाला तर बेडूक

उडाला तर पक्षी आणि बुडाला तर बेडूक अशी म्हण आहे. गौतम अदानी यांच्या उद्योगसमुहाचा पक्षी गेल्या काही वर्षांपासून उंचच उंच झेपावत होता. त्यांच्या कंपनीमध्ये भानगडी आहेत असा आरोप या आठवड्यात अमेरिकेतून झाला. त्यासरशी अदानींच्या शेअर्सचे भाव कोसळले. शुक्रवारीही बाजार पडला. अदानी हा बुडणारा बेडूक ठरणार असे अनेकांना वाटू लागले. तसे झाले तर नरेंद्र मोदी सरकारलाही फटका बसेल. मात्र हे खरेच घडेल काय हा प्रश्न आहे.

अदानी आणि मोदी

अदानी हे तीस-चाळीस वर्षांपासून धंद्यात आहेत. राजीव गांधींपासून मोदींपर्यंत सर्व सरकारांच्या धोरणांचा त्यांनी फायदा उठवला आहे. अलिकडे त्यांनीच एका मुलाखतीत हे सांगितलं. पण नरेंद्र मोदींच्या काळात अदानींची डोळ्यात भरेल (किंवा डोळ्यावर येईल) अशी भरभराट झाली हे वास्तव आहे. त्यातून मोदी सरकार आणि अदानी एकदुसऱ्याला मदत करतात असा संशय तयार झाला. २०१४ च्या निवडणूक मोहिमेत मोदींनी अदानींचे विमान वापरले होते. मोदी सत्तेत आल्यापासून देशातील अनेक बंदरे, विमानतळ इत्यादी प्रकल्प अदानींकडे गेले. मुंबई विमानतळ चालवण्याचा ठेका ज्या कंपनीकडे होता तिच्यावर धाडी पडल्या. आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी सुरू झाली. मग हा विमानतळ अदानींकडे आला. ऑस्ट्रेलियातील कोळशाच्या खाणींमध्ये अदानींना गुंतवणूक करायची होती. त्यांना नियमाबाहेर जाऊन मदत केल्याचे आरोप स्टेट बँकेवर झाले. मधल्या काळात अदानी जगातील दुसरे किंवा तिसरे श्रीमंत गृहस्थ झाले. यापूर्वी या देशात सर्वात श्रीमंत म्हटले की अंबानींचे नाव पुढे येई. आता ते मागे पडले. जिकडेतिकडे अदानी चमकू लागले. अलिकडे एनडीटीव्ही ही प्रतिष्ठित वृत्तवाहिनी त्यांनी खरीदली. मुंबईचा नवीन विमानतळ तेच उभारत आहेत. कम्युनिस्टांच्या केरळमधील बंदर विकासापासून ते काँग्रेसच्या राजस्थानातील वीजनिर्मिती प्रकल्पांपर्यंत सर्वत्र अदानींचा झेंडा आहे. तरीही हिंडेनबर्गचा तुफानी आरोप असलेला अहवाल बुधवारी प्रसिद्ध झाल्यावर विरोधाच्या तोफा मोदींकडेच वळल्या. अदानीने आपल्या कंपन्यांच्या शेअर्सचे मूल्य कृत्रिमरीत्या प्रचंड वाढवल्याचा ठपका या अहवालात आहे.

आरोपांच्या भोवऱ्यात

येथील शेअर बाजारातून आधी पैसे उभे करायचे, ते मॉरिशससारख्या देशात पाठवून तेथील कंपन्यांमार्फत पुन्हा या देशात आणायचे आणि त्यांच्यामार्फत आपल्याच कंपन्यांचे शेअर खरेदी करून बाजारात तेजी निर्माण करायची अशी अदानीची पध्दत आहे असा या अहवालातला सूर आहे. हेच चढ्या किमतीचे शेअर गहाण ठेवून अदानीने बँकांकडून प्रचंड प्रमाणात कर्जे उचलल्याचाही आरोप आहे. उद्या जर शेअरचे भाव कोसळले तर या बँकांची कर्जे बुडू शकतात असा त्याचा अर्थ आहे. अदानीवरचे हे आरोप नवीन नाहीत. यापूर्वीही वेळोवेळी ते झाले आहेत. अदानीच्या कंपन्या प्रचंड कर्जाखाली दबलेल्या आहेत असा आरोप करणारा एक अहवाल गेल्याच वर्षी प्रसिध्द झाला होता. या सर्वांबाबत अदानींनी वेळोवेळी खुलासा केला आहे. शिवाय त्यांनी हिंडेनबर्गविरुध्द न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. ही आरोप करणारी हिंडेनबर्ग हीदेखील शेअर बाजारातली एक वादग्रस्त फर्म आहे. कंपन्यांचे शेअर प्रचंड प्रमाणात विकून भाव पाडायचे आणि नंतर तेच शेअर्स कमी भावात खरेदी करून मधला नफा घ्यायचा हा कंपनीचा अधिकृत व्यवसाय आहे. मात्र असे असले तरी तिने केलेले आरोप गंभीर आहेत. त्यामुळेच गेल्या दोन दिवसात अदानींची संपत्ती हजारो कोटींनी घटली. अर्थातच हा सर्व काल्पनिक तोटा आहे. अदानींना इतक्यात तरी त्याची प्रत्यक्ष झळ लागणारी नाही. याच दरम्यान त्यांनी सुरू केलेली शेअरविक्रीही सुरळीत पार पडते आहे. या विक्रीवर परिणाम व्हावा म्हणूनच हा अहवाल आता उघड करण्यात आला असावा असाही एक तर्क आहे. ते खरेही असू शकेल.

रिलायन्सच्या वाटेने

उद्योगपतींवरची टीका नवीन नाही. नेहरूंच्या काळापासून हे चालू आहे. तेव्हा टाटा, बिर्ला, दालमिया इत्यादी सरकारचे लाडके आहेत असे म्हटले गेले. इंदिरा गांधींच्या काळात धीरुभाई अंबानींवर मेहेरनजर आहे अशी टीका झाली. त्यांची रिलायन्स कंपनी पॉलिएस्टर उत्पादनाच्या धंद्यात उतरली होती. ओर्के, बॉंबे डाईंग हे तिचे प्रतिस्पर्धी होते. पण धीरुभाईंनी इंदिरा गांधी आणि तेव्हाचे मंत्री प्रणव मुखर्जी यांना वश केले असे म्हटले गेले. रिलायन्सला फायदा होईल अशा रीतीने सरकारी धोरणात आणि अर्थसंकल्पात तरतुदी केल्या गेल्या, असे आरोप तेव्हा केले गेले. हे आरोप करणारे होते एस. गुरुमुर्ती आणि त्यांना साथ होती इंडियन एक्स्प्रेस या वृत्तपत्राची. हे गुरुमूर्ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित होते आणि मोदींनी त्यांना रिझर्व्ह बँकेवरही नेमले होते. असो. पण तेव्हा रिलायन्सच्या रोखे विक्रीत प्रचंड घोटाळा आहे असाही दावा झाला. कालपर्यंत कापडाची आणि पॉलिएस्टर गिरणी चालवणारा उद्योग जगातील सर्वात मोठा तेलशुद्धीकरण प्रकल्प कसा उभारू शकतो याबाबत संशय व्यक्त केला गेला. एकविसाव्या शतकात रिलायन्सच्या जिओ टेलिकॉमला फायद्याचे होईल असे धोरण आखले गेले, असे अनेकांचे म्हणणे होते. जिओच्या समोर टाटा, बिर्ला इत्यादी देखील टिकू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पण काळाच्या ओघात अंबानींवरचे आरोप मागे पडले. काही प्रकरणे कोर्टात गेली. पण ती टिकू शकली नाहीत. कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील सरकारी कंपन्यांच्या वाट्याचा नैसर्गिक वायू चोरल्याचा आरोप रिलायन्सवर झाला. त्याच्या खटल्यात पुढे काही झाले नाही. आज वृत्तवाहिन्यांपैकी निम्म्याअधिकांमध्ये रिलायन्सची मालकी आहे. वृत्तपत्रांमध्येही त्या कंपनीच्या विरोधात जाऊ शकेल असे कोणी नाही. अदानींची वाटचालही रिलायन्सच्या मार्गानेच चालू आहे. धीरुभाईंवर १९८० च्या दशकात झाली तशी टीका सध्या अदानींवर होत असते. राहुल गांधींसारख्या नेत्यांपासून पत्रकारांपर्यंत अनेक जण त्यांच्या विरोधात बोलत असतात. पण त्याचा ढिम्म परिणाम झालेला नाही. अदानींचा प्राण शेअर बाजारात गुंतलेला आहे. त्याच्यावर हल्ला होताच फडफड झाली. पण ती तात्पुरतीच ठरण्याची शक्यता अधिक.

विचार

चित्र आशादायी आहे...

भारतात परदेशी विद्यापीठे येणार असल्याची बातमी आशादायक आहे. मात्र त्यांना आवश्यक त्या सर्व सुविधांबरोबरच संशोधनाचं संपूर्ण स्वातंत्र्य देणं गरजेचं आहे. कदाचित ही विद्यापीठे 'इमेरेटस प्रोफेसर' ही संकल्पना राबवून भारतातील निवृत्त पण कार्यक्षम संशोधक आणि शास्त्रज्ञांच्या बुद्धी आणि कौशल्याचा वापर करुन घेतील. ही बाबही लाभदायक ठरणार आहे. म्हणूनच होवू घातलेल्या या बदलाकडे आशेने पहायला हवे.

प्रा.डॉ. मुकुंद गायकवाड

सध्या भारतात सर्वात चर्चेचा विषय परदेशी विद्यापीठे इकडे येणे हा आहे. आपल्याकडे परदेशी विद्यापीठे येणार असल्यामुळे नेमका काय बदल होईल याचे भाकित अनेकजण वर्तवताना दिसत आहेत. मी ८० देशांमधील विद्यापीठे जवळून पाहिली आहेत. त्यांचे एकमेव वैशिष्ट्य म्हणजे अनेक विद्यापीठांनी नोबेल पारितोषिक मिळवणारे शास्त्रज्ञ निर्माण केले, पण भारतातील एकाही विद्यापीठाला ते शक्य झालेले नाही. परदेशांमधील विद्यापीठांना ते का शक्य झाले? या प्रश्नांचे उत्तर म्हणजे तेथील उद्योगपती आपल्या उद्योगाला आवश्यक असणारे संशोधन भरपूर पैसे देऊन आणि मदत करुन विद्यापीठाकडून करवून घेतात. आपल्याकडील एक उदाहरण द्यायचे म्हटले तर सिरम इन्स्टिट्युटच्या पुनावाला यांनी ब्रिटनच्या ऑक्सफर्ड विद्यापीठाला संशोधनासाठी कोट्यवधी रुपयांची देणगी दिली आहे. असं असताना त्यांना भारतातील एकाही विद्यापीठाला देणगी का द्यावीशी वाटली नाही, हा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही.

वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रातील शिक्षण बंधनमुक्त झाले आणि त्यातून गावोगावी आणि प्रत्येक शहरात शिक्षणसम्राट उदयाला आले. या पर्वानंतर आता परदेशी विद्यापीठांना भारतातील दारे खुली झाली आहेत किंवा त्यांच्यासाठी भारताचे रान मोकळे झाले आहे. काहींच्या मते, ही विद्यापीठे इथे पैसे कमावण्यासाठी येतील. पण याबाबत एक वेगळे मत आहे. जगातील अनेक बुद्धिमान लोक अमेरिकेत स्थायिक झाले आणि त्या देशाच्या समृद्धीचे कारण ठरले ते तेथील आघाडीच्या शिक्षणसंस्थांमुळेच. कोणत्या शिक्षणप्रणालीसाठी विद्यार्थी अमेरिकन विद्यापीठांकडे धाव घेत आहेत, याचा विचार करता इंजिनिअरिंगसाठी कोणी तिथे जाताना दिसत नाही तर भारतीय विद्यार्थी अमेरिकेमध्ये गणित आणि संगणकीय शास्त्रातील शिक्षणासाठी वळले आहेत.

२००९-१० मध्ये अमेरिकेत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ४०,७०० विद्यार्थ्यांपैकी ३८.०८ टक्केविद्यार्थी संगणकीय कौशल्य मिळवण्यासाठी तिकडे गेले होते. २०२१-२२ मध्ये गणित आणि कॉप्युटर सायन्स या विषयात शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ३६.०७ टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचले. दरम्यानच्या काळात अमेरिकेत गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १,९९,१८२ पर्यंत वाढली. २०१० मध्ये २० टक्के अमेरिकन लोक कारखान्यांमध्ये काम करत होते. ७८ टक्के लोक शिक्षक, डॉक्टर्स, वेब साईट डिझायनर, कॉम्प्युटर सायन्समधील कामे करत होते आणि केवळ दोन टक्के लोक शेती करत होते. आता भारतात या शिक्षणसंस्था नेमके कोणते अभ्यासक्रम सुरू करतील हे पहावं लागेल कारण ते निश्चितच इथे शेतीविषय अभ्यासक्रम सुरू करणार नाहीत.

भारतातील डीम विद्यापीठे परदेशांमधील विद्यापीठांच्या मानाने महागडी आहेत असे एका अभ्यासातून सिद्ध झाले आहे. येथील उच्च शिक्षण किती लोकांना परवडते, या प्रश्नाच्या उत्तरासाठी अलिकडच्या 'टाईम्स ऑफ इंडिया'मधील आकडेवारी बोलकी आहे. त्यात म्हटले आहे की, पाच टक्के भारतीयांकडे देशातील ६२ टक्के संपत्ती एकवटली आहे आणि तळातील ५० टक्के लोकसंख्येमध्ये फक्त तीन टक्के संपत्ती आहे. म्हणजे डीम विद्यापीठातील शिक्षण ८० टक्के लोकांच्या आवाक्याबाहेरील आहे. अमेरिका वा इतर प्रगत देशांमधील उद्योगधंदे मनुष्यबळासाठी तेथील विद्यापीठांवर अवलंबून असतात. परंतु भारतीय विद्यापीठे, डीम विद्यापीठे फक्त पदव्यांच्या पाठीमागे धावताना दिसतात. जागतिक स्तरावर संशोधनासाठी किंवा नवनवीन अभ्यासक्रम तयार करण्यासाठी भारतातील एकाही विद्यापीठाने नाव कमावलेले नाही. फक्त परदेशी विद्यापीठांची नक्कल करणे एवढेच एक ध्येय ठेवल्यामुळे असेल पण, जगातील पहिल्या ५०० विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही ही सगळ्यात लाजिरवाणी बाब आहे.

आपल्या देशात परदेशी विद्यापीठे आल्यामुळे येथील शिक्षणसम्राटांना निश्चितच शह बसणार आहे. कदाचित परदेशी विद्यापीठे येथील गरीब विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी वेगळे अभ्यासक्रम आखण्याचा अंदाज आहे. परदेशातील काही आधुनिक ॲप्सचा अभ्यास केला असता जगात सगळीकडे पोहोचलेल्या स्टारफोनम ध्ये काही अचाट गोष्टी दिसल्या. जगभरात निवृत्त झालेली बरीच कौशल्ययुक्त माणसे आहेत. त्यांचा वापर करुन स्वस्तात शिक्षण कसे देता येईल, यासंबंधीची अनेक ॲप्स परदेशी विद्यापीठांनी तयार केली आहेत. आपल्याकडे कौशल्य नव्हते असे नाही. बारा बलुतेदारांमध्ये अमाप कौशल्य होते. एके काळी भारतात सुवर्णकाळ नांदत होता, आपले उत्पन्न जगातील एकूण उत्पन्नाच्या १८ टक्के होते, परंपरागत शिक्षणपद्धती होती. पण ब्रिटीशांनी ती मोडून काढली.

आता कदाचित परदेशी विद्यापीठे त्यांच्या स्वार्थासाठी 'स्मॉल इज ब्युटिफूल' हे तत्त्व वापरुन व्यावसायिकांच्या दृष्टीने संशोधनावरील काही अभ्यामक्रम सुरू करतील, कारण ते आपला अभ्यासक्रम दरवर्षी बदलत असतात. तसा विचार केला तर काही नावाजलेल्या विद्यापीठांनी जगात कुठेही आपल्या शाखा उघडलेल्या नाहीत, कारण ते दर्जाबाबत अत्यंत काळजी घेतात, आग्रही असतात. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज ही एक हजार वर्षांपूर्वीची विद्यापीठे आपल्या प्रथा काळजीपूर्वक सांभाळून, संशोधनाच्या कामात कोणाचाही हस्तक्षेप सहन करत न करता संशोधकाला काहीही कमी पडू देत नाहीत. तिथले विद्यापीठप्रमुख आपले कोणतेही विचार संशोधकांवर लादत नाहीत.

याउलट आपल्याकडील विद्यापीठे हुकूमशाही पद्धतीने काम करत आहेत. आजही आपल्याकडचे संशोधन अभ्यासक्रम मंडळाची मान्यता घेणे, कुलगुरूंची मान्यता घेणे, युजीसीची मान्यता घेणे अशा प्रक्रियेमध्ये अडकले आहे. याउलट परदेशात संबंधित व्यक्तीची कोणतीही कल्पना असली तरी तिचा आदर करुन अमर्याद सोयी पुरवण्यास प्राधान्य दिले जाते. परदेशात 'इमेरेट्स प्रोफेसर' ही कल्पना रुजली आहे. आईन्स्टाईनला जर्मनीतून हाकलून दिल्यानंतर अमेरिकेतील क्रिस्टन विद्यापीठाने त्याच्यासाठी हा शब्द आणि परंपरा निर्माण केली. आज सर्व विद्यापीठांनी ती स्विकारली आहे. या अंतर्गत ही विद्यापीठे चांगल्या संशोधकाला त्याच्या आयुष्याच्या शेवटपर्यंत सांभाळतात, हवा तेवढा निधी उपलब्ध करुन देतात. यामागील कल्पना अशी की निवृत्त शास्त्रज्ञ आणि त्याची प्रगल्भता वयाबरोबर वाढत असते. तिचा लाभ संशोधक संस्थेला आणि इतरांना मिळवून देण्यासाठी ही योजना अत्यंत लाभकारक ठरली आहे. याउलट एखादा माणूस कितीही बुद्धिमान असला तरी आपली विद्यापीठे आणि युजीसी निवृत्तीचे वय झाले की बाहेरचा रस्ता दाखवतात. भारतातील एकाही विद्यापीठामध्ये अमेरिकेसारखे 'इमेरेटस प्रोफेसर' दिसत नाहीत. त्यामुळे कदाचित अमेरिकन विद्यापीठे येथील निवृत्त होऊन घरी बसलेल्या नामवंत शास्त्रज्ञांना नव्याने कामाची संधी देण्याची शक्यता दिसते. अमेरिकन विद्यापीठे 'नेव्हर गिव्ह अप' वा 'नेव्हर से डाय' या तत्त्वाने वागतात. नव्या कल्पनेसाठी ती नेहमीच हपापलेली असतात. त्यामुळे भारतात या विद्यापीठांद्वारे आर्थिक क्रांती होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच त्यांचे स्वागत करायला हवे.

ही विद्यापीठे त्यांचे स्वतंत्र परिसर तयार करतील की येथील डीम विद्यापीठांशी भागीदारी करतील याचा अंदाज अद्याप आलेला नाही. स्वतंत्र परिसर निर्माण करण्यासाठी त्यांना मोठी जागा आणि वीज, पाणी आदी सुविधा लागतील. भारत सरकार त्यांना हे सर्व देण्यास तयार आहे का, याचा खुलासा युजीसीच्या घोषणेमध्ये दिसत नाही. भागीदारी करुन फक्त त्यांच्या नावाच्या पदव्या दिल्या तर कौशल्य निर्माण होणार नाही.

म्हणूनच भारत सरकारने त्यांना अमेरिकेत असतं तसं सर्व प्रकारचं स्वातंत्र्य दिलं तरच खरी प्रगती होऊ शकेल. १८६२ मध्ये अब्राहम लिंकन अध्यक्ष असताना अमेरिकेत अन्नधान्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. त्यावर उपाय म्हणून त्यांनी 'लँड ग्रँड विद्यापीठे' निर्माण केली. म्हणजेच एकेका विद्यापीठाला हवी तेवढी जमीन फुकट देऊन टाकली.

पुढे त्यावर उभारलेल्या संस्थांमध्ये प्रचंड संशोधन झाले आणि अमेरिकेने जगातील शेतीक्षेत्राचा चेहरामोहराच बदलून टाकला. याच लँड ग्रँड विद्यापीठांनी आपल्यामध्ये जगाला धान्य पुरवण्याइतकी क्षमता निर्माण केली. सारांश, विद्यापीठे आणि संशोधन हेच देशाला सामर्थ्यवान बनवतात, हे तत्त्व अमेरिकेने सिद्ध केले आहे. आपणही होऊ घातलेल्या या बदलाकडे आशेने बघायला हवे.

आजकाल

भारत आणि अमेरिका - एक तुलना

श्याम केळकर

जेट जगदीश यांची भारत आणि अमेरिका यांची तुलना पाहिली. भारत हा अत्यंत प्राचीन देश आहे आणि १२ ही महिने राहण्यासाठी सोयीस्कर असे हवामान. त्यामुळे प्राचीन काळापासून अनेक ठिकाणाहून विविध माणसे येथे येऊन राहू लागली.

अमेरिकेचा इतिहासच जेमतेम ४००-४५० वर्षांचा. आणि बाहेरून आलेल्या माणसांनी मूळ रहिवाश्यांना जवळपास नष्टच केले. त्यामुळे ४००-४५० वर्षांपूर्वीची भारताची लोकसंख्या आणि अमेरिकेची लोकसंख्या इथूनच फरक सुरू होतो. भारताची लोकसंख्या वाढली ती आरोग्यसेवा सुधारली-विशेषत: स्वातंत्र्य मिळाल्यानंतर. आपल्या आजी आजोबांना - १०० वर्षांपूर्वी ९-१० मुले असत पण तरी लोकसंख्या वाढत नसे. (युरोपमध्येही १५० वर्षांपूर्वी ८-९ मुले होत असत) कारण मरतही तेवढीच. पण आज ही सरासरी २.१६ वर आली आहे. अमेरिकेचा हा आकडा १.६ आहे. अमेरिका गेली २५० वर्षे स्वतंत्र आहे हेही लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे लोकसंख्या वाढली ह्याबद्दल भारतीयांना दोष देण्याचे कारण नाही. वैज्ञानिक दृष्टीकोनातून देखील आपण मागासलेले आहोत. स्वतंत्र्यानंतर आपण शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. पारतंत्र्यामुळे आणि धार्मिक रूढींच्या मुळे पण आपण मागासलेले होतो. भारताची लोकसंख्या १९५० च्या सुमारास होती सुमारे ३५ कोटी आणि अमेरिकेची १५ कोटी. भारताची झाली १३५-१४० कोटी (४ पट) आणि अमेरिकेची ३४ कोटी (२.२६ पट) १९५० साली अमेरिकन स्वातंत्र्याला १७४ वर्षे झाली होती आणि आपण स्वातंत्र्य नुकतेच मिळविले होते.

त्यामुळे लोकसंख्या जास्त आहे हे खरे असले तरी त्याबद्दल स्वतःला बदनाम करायचे कारण नाही. (आजही TFR जास्त आहे तो बिमारू राज्यात) आपण परतंत्र होतो हे मुख्य कारण.

भारताची लोकसंख्या जास्त नाही असे मला बिलकुल म्हणावयाचे नाही. फक्त भारत अमेरिका तुलना योग्य नाही एवढेच मला म्हणावयाचे आहे.

युरोपमध्ये वैज्ञानिक क्रांतीबरोबरच वैचारिक आणि सामाजिक क्रांती झाली. आपल्याला स्वातंत्र्य आणि लोकशाही मिळाली तेव्हा शैक्षणिक, आरोग्यविषयक, वैचारिक, सामाजिक आणि आर्थिक अशा विविध पातळीवर युरोप- अमेरिका ज्या बिंदूपाशी होती त्याच्या कितीतरी मागे १९५० साली आपण होतो. तरीही १९५१ साली असलेला ६.३ हा TFR हा २०२२ साली म्हणजे ७१ वर्षात आपण २.१६ (अंदाजित) पर्यंत आणू शकलो हे यशही काही कमी नाही. (आता तर वैचारिक आणि सामाजिक बाबतीत आपण १९४७ च्याही मागे चाललो आहोत.) १९६४ पर्यंत आकाशवाणी ही सरकारी होती. ती जोपर्यंत सरकारी होती तोपर्यंत ती वैचारिक सुधारणांचा पण प्रयत्न करीत असे. वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्याचा प्रयत्न करीत असे. तेव्हा आकाशवाणीवर जाहिरातीही नसत. आकाशवाणी हे उत्पन्नाचे साधन असा विचार पंडित नेहरू यांनी कधीही केला नाही. (तेव्हा डाग वाईटच असत.) - रेडिओला परवाना शुल्क असे आणि त्यात काही गैर नव्हते.

जे जे सरकारी , ते ते वाईट अशी धारणा उच्च मध्यमवर्गात रुजली त्याचे दुष्परिणाम आज आपण पहात आहोत. आता असंख्य दूरचित्रवाहिन्या आहेत. त्यातील एक तरी वैचारिक आहे का? गुढीपाडवा, गणपती, दिवाळी, होळी, शिमगा, मंगळागौरी, हळदीकुंकू, डोहाळेजेवण, चोरओटी नवरात्र, दत्तजयंती, लग्नानतरचा गोंधळ असल्या सर्व गोष्टींनी वाहिन्यांचा ताबा घेतला आहे. सावित्रीज्योती मालिकेला प्रायोजक मिळत नाही म्हणून ती अर्धवट सोडून द्यावी लागते. दूरदर्शनचा आरंभ- काळ आठवत असेल तर पहा. त्यावेळचे कार्यक्रम हे आजच्यापेक्षा जास्त दर्जेदार असत, वैचारिक असत, वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे असत. शिक्षण, आरोग्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या तीनही गोष्टी यात परिणामकारक ठरतात. या तीनही बाबतीत आपली प्रगती १९४७-१९६४ या काळात कौतुकास्पद अशीच होती. आता मात्र आपण या तीनही गोष्टीत झपाट्याने मागे पडत चाललो आहोत. (असरचा अहवाल हेच सांगतो.) पंडित नेहरू यांच्या काळात संपूर्ण देशभर दारूबंदी होती. त्यामुळे दारू पिणे वाईट हे लहानपणापासूनच शालेय पातळीवर बिंबवले जाई. दारुबंदीमुळे महसूल बुडत आहे असे लहानपणी एकदाही वाचल्याचे मला आठवत नाही. आता तर फेसबुकवरील ५०% हून जास्त पोस्ट्स मध्ये दारूचे कौतुक असते. एकही हास्यजत्रेचा कार्यक्रम दारूच्या उल्लेखाशिवाय आणि सहभागाशिवाय पूर्ण होत नाही. हे सर्व योग्य दिशेने चाललेले आहे असे मला तरी वाटत नाही.

आपण योग्य दिशेने चालत होतो. पण १९६९ साली काँग्रेस फुटली त्यामुळे मग दिशा भरकटली.

व्हायरल

मोदींचे भाषण आणि संस्कार!

संस्कार : चिरंजीवांच्या कॉलेजमध्येही माननीय प्रधान मंत्री आज 'परिक्षा पे चर्चा' करणार आहेत. चर्चेसाठी उपस्थित राहण्यासंबंधी कॉलेजकडून सक्त मेसेज आलेला आहे. तो जाणार नव्हता, कारण त्याला पंप्रची मतं आवडत नाहीत. अशात BBC की काय या ब्रिटीश सरकारच्या अखत्यारीतील प्रसारमाध्यमाने पंप्र यांच्यावरील दोन साधे माहितीपट प्रसिद्ध केलेत, ते आपल्याकडे का बॅन केलेत? हा त्याला अशात पडलेला प्रश्न. दुसरा प्रश्न पडलेला आहे आणि त्याचा त्याला रागही आलेला आहे, तो प्रश्न म्हणजे,गछण आणि देशातील अनेक विद्यापीठांमधील विद्यार्थी ते माहितीपट बघूद्या म्हणून लोकशाही पद्धतीने शांततेत आंदोलन करीत असताना, त्यांच्यावर हल्ले का करण्यात आले?

मी त्याच्याशी चर्चा करीत असताना नेहमी जे तुकड्या तुकड्यात म्हणत असतो, तेच परत एकदा सलग म्हणालो की, मा. पंप्र तुमच्याशी करणारी चर्चा भलेही ती एकतर्फी असेल ती तू ऐकणे महत्वाचे आहे. कारण ते आपल्या देशाचे लोकांनी निवडून दिलेले पंप्र आहेत. आणि पंप्र हे कोणत्याही पक्षाचे वा विचारांचे नसतात, तर ते या देशाचे असतात. तुझं वयच किती आहे, अजून तुला अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत,म्हणजे तू सज्ञान झालेला नाहीस. तुझी मतं 'तयार' होण्याचे हे वय आहे. तू कोणत्याही विचारसरणीचा हो,मग त्यासाठी तुला आपल्याला जे आवडत नाहीत,त्यांना नीट समजून घेणे गरजेचे आहे. तू मंदिरात जा किंवा जाऊ नकोस असं मी तुला कधीही सांगितले नाही, तरीही तू मंदिरात नं जाण्याचा निर्णय तुझा आहे. आपल्याला ज्यांचे विचार पटत नाहीत, ते विचार का पटत नाहीत हे समजून घ्यायचं असेल तर, कुठल्याही सभेला, मिटींगला, जत्रेला, तीर्थक्षेत्री, कीर्तनाला, भागवत कथेला, अभ्यासवर्गाला गेलास तरी,तिथं येणारे भक्त, तिथं नकळतपणे रुजविली जाणारी धार्मिकता, घेतली जाणारी बौद्धिकं तटस्थपणे ऐकण्याची कला तुला सरावाने 'कमावता' येईल. तिथं जे दिसेल, सांगण्यात येईल ते नंतर तू तुझ्या पद्धतीने तपासून घेऊ शकतोस, कुणा विचारवंतांना, अभ्यासकांना विचारू शकतोस.तुला जे तुझ्या मताच्या विरोधी वाटतात, ते तसे का वाटतात, तुझ्या वैचारिक भूमिकेचा पाया पक्का करायचं असेल, तर त्यांची विचारसरणी तुला सखोल समजून घ्यावी लागेल. त्यासाठी तुला इथले धर्मग्रंथ, धार्मिक साहित्य, इतिहास, धर्म, संस्कृती, सामाजिक व्यवस्था,जातीव्यवस्था,आपली राज्यघटना समजून घ्यावी लागेल. कोणतेही विचार, सामाजिक व्यवस्था आणि राजकीय व्यवस्था या परिपूर्ण नसतात आणि महान तर बिलकुल नसतात. ज्यांना आपलीच संस्कृती, धर्म, देश महान वाटतो अशा लोकांशी चर्चा करण्यात तुझा अमूल्य वेळ दवडू नकोस. तुला जे आभासी वैचारिक विरोधक वाटतात, त्यांना अगोदर समजून घे. तुला इथं अनेक विचारसरणीचे 'प्रचारक' भेटतील; त्या सर्वांशी सुसंवाद असूदे. त्याशिवाय तुला कोण जवळचे आणि कोण लांबचे हे कळणार नाही.त्याची सुरुवात आज तुला मा.पंप्र च्या चर्चेपासून करायलाच हवी. तुला बारावीत पास व्हायला हवे.

- शाहू पाटोळे

लोकसंसद

भारताचे यशस्वी पाऊल

अरुणाचल लगत आपल्या हद्दीत केवळ ३० किलोमीटर एवढ्या अंतरावर चीन सर्वात मोठा प्रकल्प बांधत आहे . ब्रह्मपुत्र नदीला मनमानी पद्धतीने बांध घालून चीन कृत्रिम पूर आणण्याचे प्रयत्न गेली सुमारे ११ वर्षे करीत आहे. अरुणाचल प्रदेशातील चीनचा प्रस्तावित प्रकल्प चीनच्या सर्वात मोठ्या बार्ज धरणाहून मोठा आहे.अरुणाचल मधील चीनच्या प्रकल्पाची उंची १८१ मीटर तर रुंदी अडीच किला मीटर नियोजित आहे. याची क्षमता ६० हजार मेगावॅट एवढी प्रचंड असणार आहे. चीनने गेल्या ११ वर्षात ११ विधुत प्रकल्प उभारले आहेत ब्रह्मपुत्र नदीचे पाणी अडवून व त्याचा मोठा विसर्ग करून भारतामध्ये प्रसंगी कृत्रिम पुर आणण्याच्या या चीन कटावर भारताने पण आपली चाल खेळली आहे.भारताने या भागात एकूण तीन जलविद्युत प्रकल्पाची उभारणी त्वरेने सुरु केली आहे. उपनदी सुबनसिरी जलविद्युत प्रकल्पातून चालू वर्षात २ हजार मेगावॅट वीजनिमिती होणार आहे.कामेंगमध्ये ८० किलो मीटर क्षेत्रात ८२०० हजार कोटीचे दोन जलविद्युत प्रकल्प उभारण्यात येणार आहेत या शिवाय दिवांग येथे सुद्धा प्रकल्प सुरु होणार आहे. एकूणच चीनची चाल भारताने यशस्वीपणे रोखण्याचा प्रयत्न केला आहे. पण भविष्यात सुद्धा भारताने सावध राहिले पाहिजे

- शांताराम वाघ, पुणे

प्रेरणा

वदेवाणी परि दुर्लभ अनुभव ।

समाजातील दुःख, दारिद्र्य, शोषण, पिडन आपल्याला दिसत नाहीत. म्हणून तुकोबा सांगतात, लक्षात ठेवा, आपण दंभात राहिलो, आपला दंभ वाढवला तर आपले प्रचंड नुकसान होईल. आपण आपला दंभ सोडला पाहिजे, दंभ सोडून खरं खोटं जाणलं पाहिजे. सत्याचा शोध घेतला पाहिजे. तकोबा म्हणतात, बरं झालं मी जागा झालो, माझे मन जागे झाले. मला सत्याचा शोध घेता आला, मला खरं खोटं कळलं. खोट्या, लबाड, समाजाची फसवणूक करणाऱ्या लोकांची मला माहिती झाली. तुकोबा सत्यासाठी, सत्याबरोबर उभे राहिले. तुकोबा म्हणतात, सत्यासाठी उभे रहा, माझ्याबरोबर सत्यासाठी उभे रहा.

तुकोबा सत्यवादी संत होते.

वदेवाणी परि दुर्लभ अनुभव ।
चालीचा चि वाहो बहुतेक ।।१।।
आह्मी ऐसें कैसें राहावें निश्चळ ।
पाठिलागा काळ जिंतितसे।।
वाढवितां पोट दंभाचे पसारे ।
येतील माघारे मुदला तोटे ।।२।।
तुका ह्मणे बरें जागवितां मना ।
तुमच्या नारायणा अभयें करें ।।३।।

तुकोबा सांगतात, आम्ही असे कसे संवेदनाहीन, गतीहिन, स्थिर दगड बनावे ? आम्ही काहीच हालचाल करू नये काय ? असे होणार नाही. पूर्वी आम्ही असेच वागलो, आम्ही आमच्या संवेदना जाग्या केल्या नाहीत. त्यामुळे आमचे प्रचंड नुकसान झाले. जातीची उतरंड, सत्ता, अधिकार अशा अनेक कारणाने आपल्या अंगी ' मीपणा' शिरतो, मुरतो, वाढतो आणि त्याचे अहंगंडात रूपांतर होते, आम्ही दंभ धारण करतो. या दंभाने आम्ही आंधळे बनतो, आमच्या संवेदना मरतात.

- विजय भगत

दिन वार्ता

पंचांग

२८ जानेवारी २०२२शनिवार, विक्रम संवत२- २०७९
शालिवाहन शके संवत२- १९४४, संवत्सर शुभकृत्नाम अयन- उत्तराणायन मास- माघ ऋतु- शिशिर शुक्ल पक्ष
तिथि:सप्तमी ०८:४३:२३, नक्षत्र:अश्विनी १९:०६:००
योग:साध्य ११:५४:२६, करण:वणिज ०८:४३:२३
करण:विष्टि २०:४८:३३, सूर्य :मकर चन्द्र:मेष हिजरी सन२ - १४४४
मुस्लिम मास - रज्जब, तारीख - ५

विशेष

रथसप्तमी,भीष्माष्टमी, लाला लाजपतराय जयंती, कश्यपाचार्यस्वामी जयंती - राजगुरूनगर (पुणे), नानाजी महाराज दहीहंडी यात्रा - कापशी (वर्धा) महार्षि नवल जयंती - नागपूर

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद) - मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

श्री. राजेन्द्र प्रेमजी जैन, वाढदिवसानिमित्त अलिबाग

सुडोकू

	9	2	4				7	3
5	4		2				9	
				5	1	2		4
		7	8		9			
	8		6		3		1	
			7		5	8		
3		6	1	9				
	2				6		3	9
8	1				2	4	5	

गुरूवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

1	5	7	6	3	2	8	9	4
2	9	6	8	1	4	5	7	3
4	3	8	7	9	5	1	2	6
6	1	9	2	8	3	7	4	5
5	4	2	1	6	7	3	8	9
8	7	3	5	4	9	6	1	2
7	2	4	3	5	8	9	6	1
9	6	5	4	7	1	2	3	8
3	8	1	9	2	6	4	5	7

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या वतीने, प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक, रत्नागिरीद्वारे खालील कामासाठी खुली ई-निविदा मागविण्यात येत आहे.

क्र.सं.:1. कामाचे नाव आणि निविदा क्र. एसएसई/डब्ल्यू/रत्नागिरी विभागातील एसईएन/डब्ल्यू/रत्नागिरी अंतर्गत संगमेश्वर रोड, रत्नागिरी आणि निवसर यार्ड येथे फूट ओव्हर ब्रिज (एफओबी) चे पेंटिंग. **(निविदा क्र.: केआर-आरएन-एसईएन-डब्ल्यू-2022-12), दिनांक: 30.01.2023. अंदाजित खर्च** : ₹ 8,61,784/-. **ईरठे** : ₹ 17,200/-. **निविदा ऑनलाइन जमा करण्याची शेवटची तारीख व वेळ: 20.02.2023 रोजी 15.00 वाजे पर्यंत.**

क्र.सं.:2. कामाचे नाव आणि निविदा क्र. जेई/डब्ल्यू/विलवडे विभागांतर्गत स्टाफ क्वार्टरचे रंगकाम आणि स्टेशनच्या प्लॅटफॉर्म शेडच्या छताची दुरुस्ती. **(निविदा क्र.: केआर-आरएन-एसईएन-डब्ल्यू-2022-32), दिनांक: 30.01.2023. अंदाजित खर्च**: ₹ 11,08,939/-. **ईरठे**: ₹ 22,200/-. **निविदा ऑनलाइन जमा करण्याची शेवटची तारीख व वेळ: 20.02.2023 रोजी 15.00 वाजेपर्यंत.**

क्र.सं.:3. कामाचे नाव आणि निविदा क्र. एसई/डब्ल्यू/चिपळूण विभागांतर्गत चिपळूण, खेड आणि नातुवाडी सब स्टेशन येथील स्टाफ क्वाट्र्सची दुरुस्ती. **(निविदा क्र.: केआर-आरएन-एसईएन-डब्ल्यू-2022-33), दिनांक: 30.01.2023. अंदाजित खर्च**: ₹ 10,07,802.14/-. **ईरठे**: ₹ 20,200/-. **निविदा ऑनलाइन जमा करण्याची शेवटची तारीख व वेळ: 20.02.2023 रोजी 15.00 वाजे पर्यंत.**

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक, कार्यालय एमआयडीसी एरिया, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. (संकेतस्थळ :www.ireps.gov.in).

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल श्री. हेमंत शांताराम दिसले व सौ. मधुरा हेमंत दिसले रा. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड यांना खालील नमूद केलेल्या बिनशेती मिळकत खरेदी करावयाचे आहेत ती येणेप्रमाणे :-

मिळकतींचे वर्णन

मौजे देऊळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत

नाव	सर्व्हे नं./ हिस्सा नं./ प्लॉट नं.	एकूण क्षेत्रफळ आर.चौ.मी.	आकार
भोगवटादार ज्ञानदीप सह. गृहनिर्माण संस्था व इतर अधिकारात सभासद श्री. विजय घन:शाम गांगल	७०/२/ब/२२	३.९६.६०	३९.६६

वरील मिळकती संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचे गहाण, बक्षीसपत्र, फरोक्त, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, मृत्युपत्र इत्यादी प्रकारचे कोणताही करार केलेला असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवावी.

वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून आलेली हरकत आमचे अशिल विचारात घेणार नाही.

दिनांक : २७/०१/२०२३

ॲड. रविकर राघो गायकवाड
रा. १२१, नाना मास्तर नगर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९०४९४३८३८३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हातनोली, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

जमीन मालकांची नावे	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.
साहेबराव सुखदेव खिलारी	५९	१/ब	0-३२-३०
	५९	२/अ/१	0-३३-२०
	५९	२/अ/२	0-८९-00
	५९	२/अ/३	0-२८-00
	५९	२/अ/४	0-०५-00
	५९	२/अ/६	0-०१-00
मयुर मोतीराम ठोंबरे	५९	२/अ/५	0-१७-५०
निलम प्रेम सागर	६०	१	0-१७-00

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०१/२०२३

ॲड. सी.बी. ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेंट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत
जि. रायगड - ४१०२०१

नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. सतिश गणपत पाटील यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकिलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

मौजे रेवदंडा, तालुका अलिबाग, जिल्हा-रायगड

मौजे	ग.नं.	एकूण क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)
रेवदंडा ता. अलिबाग	५१	क्षेत्र ६७-३०-00	६७३

या मिळकतीपैकी **श्री. सतिश गणपत पाटील** यांचे मालकीचे क्षेत्र ५-00-00 आर.चौ.मी. आकार ५०-00 या क्षेत्रापैकी क्षेत्र २-00-00 आर.चौ.मी. ही बिनशेती मिळकत

दिनांक : २७/०१/२०२३
अशिलांची सही

सही/-
ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम. कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक १) भूषण लक्ष्मण भगत, २) प्रतिक्षा उमेश पाटील, ३) संतोष गजानन भगत, ४) ललिता लक्ष्मण भगत, ५) राम गजानन भगत, ६) नम्रता नारायण वेळे आणि ७) मालती मधुकर पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले असून त्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये साठेकरार झालेला आहे.

मिळकतींचे वर्णन की,

मौजे वाडगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

भूमापन क्रमांक व त्याचा उपविभाग	ULPIN	एकूण क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.
२०७	३८२१०९३६६९८	0.५५.१०	९.५६

उपरोक्त एकूण 0.५५.१० हे.आर.चौ.मी. या क्षेत्रफळापैकी दक्षिण दिशेकडील 0.२०.१ हे.आर.चौ.मी. इतकी शेती मिळकत

सदरहू मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमूद मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबत भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहू मिळकतीबाबत आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर वर नमूद मिळकतीबाबत खरेदी व्यवहार करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २४-०१-२०२३

सही/-
श्री. अमित महेश्वर देशमुख
ॲडव्होकेट आणि नोटरी
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

जाहिर परिपत्रक

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सर्व भूखंडधारकांना या जाहीर परिपत्रकाने कळविण्यात येते की, मऔविम **महाड अतिरिक्त महाड, पंचतारंकित महाड, विळे भागाड** औद्योगिक क्षेत्रामधील भूखंडधारकांना मुदतवाढ संदर्भात विशेष मुदतवाढ योजना लागू करण्यात आली आहे. तसेच सदर योजने अंतर्गत परिपूर्ण अर्ज स्विकारण्याची **अंतिम मुदत दिनांक ३०/०६/२०२३** पर्यंत राहणार असून सदर योजना ही सर्व प्रकारच्या भूखंडांना लागू राहील.

उद्योजकांना उद्योग वाढीकरिता प्रोत्साहन देण्यासाठी **शेवटची संधी म्हणून मुदतवाढ** योजना राबविणे आवश्यक असल्यामुळे सदर योजना महामंडळाने राबविली आहे. तरी सर्व भूखंडधारकांनी सदर योजनेचा दिलेल्या मुदतीमध्ये लाभ घ्यावा.

सही/-
(संतोष ह.करंडे)
कार्यकारी अभियंता व विशेष नियोजन
प्राधिकरण, मऔविम, स्थापत्य विभाग, महाड

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

RE-E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fees:** Rs.500/- + GST.

Sr. No.	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	**RFx No. 7000025804** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-55/2022-2023 RFx Re-e-tender for Supply of HTLS compression type palm connector at 220kV GIS Wadkhal Substation under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 3,66,713/- **EMD:** Rs. 5,000/-
2	Online Downloading of the RFx	30.01.2023, 17:00 Hrs to 06.02.2023, 23:59 Hrs.
3	Online Submission of the RFx	On or Before 06.02.2023 up to 23:59 Hrs.
4	Online Opening of the Techno-Commercial RFx	07.02.2023 at 11:00 Hrs (If possible)

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: The Add'l Executive Engineer, (O): 022- 2746 5410.
Note: All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

कर्जत येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज ७/२०२३
ने.ता. ०३/०३/२०२३ नि.नं. ७/ड

मनिषा बन्सी पाटोळे व इतर ४ **... अर्जदार**
विरुद्ध
कोणीही नाही **... सामनेवाला**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते अर्जदार नं. ४ यांचे वडील कै.श्री. बन्सी बंडू पाटोळे हे दिनांक १४/०५/२०१९ रोजी पॅनासिया हॉस्पिटल, नवीन पनवेल येथे मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात अर्जदार हेच वारस असल्यामुळे, वारस दाखला मिळणेसाठी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कोणाही व्यक्तीची हरकत असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत कर्जत येथील मे. दिवाणी न्यायालयात घ्यावयाची आहे. या कालावधीत हरकती आल्या नाहीत, तर अर्जदार यांना तसा दाखला देण्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून मे. न्यायालय पुढील आवश्यक तो हुकूम करील यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
क. लिपिक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, कर्जत

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, कर्जत

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे किरवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. महेश कृष्णा बडेकर यांचेकडून कायमची विकत घेण्याची ठरविली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकत परिशिष्ट

घर क्र.
२५२ (३५X३०) चौ.फू. ८२४ रु. घरपट्टी

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाणखत, वारसहक्क, इजमेंट हक्क अथवा कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांचे खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विकसन कराराचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २८/१/२०२३

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०९, ममदापूर रोड,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१२७९८१७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे आगरसुरे (नवीन महसुली गाव नांदाईपाडा) व सुरेखार तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती बाबत आमचे अशिलांनी दिनांक ०४/०६/२०१२ रोजी, सदर मिळकती कायम स्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याबाबत विद्यमान मालक१.किसन पाडुरंग पाटील, २.सुरेश पांडुरंग पाटील ३.प्रभाकर पांडुरंग पाटील ४.शैलेजा वसंत पाटील ५.मनोज वसंत पाटील ६.महेश वसंत पाटील ७.मुकेश वसंत पाटील ८.जोत्सना मधुकर नवले सर्व राहणार नांदाईपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड यांचे सोबत साठेकरार केला होता व आहे.

मिळकतीचे वर्णन

गावाचे नाव	सर्व्हे/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
१.मौजे आगरसुरे (नविन महसुली गाव नांदाईपाडा) तालुका अलिबाग, जिल्हा रायगड	गट नंबर ७१ (जुना स.नं.४०५)	0	0.३४.00 पो.ख.0.०३.00 एकूण0.३७.00	८.00
२.मौजे सुरेखार तालुका अलिबाग, जिल्हा रायगड	गट नंबर ५७	0	१.१४.३ पो.ख.0.०५.८ एकूण १.२०.१	१५.५०

सदर मिळकतीबाबत साठेकरार करतांना आमचे अशिलांनी मिळकतीचे मालकांसोबत अशा प्रकारचा साठेकरार आमचे अशिलांनी केलेला आहे व या पुढे अन्य कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये म्हणून जाहीर नोटीस 'दैनिक रायगड टाइम्स' या वृत्तपात्रांतून तारीख २३/०१/२०१३ रोजी प्रसिद्ध केली होती. तसेच, सदर मिळकत निर्वेध झालेनंतर आमचे अशिलांनी सदर मिळकतीबाबत रजिस्टर खरेदीखत करून देण्यासाठी मिळकतीचे मालक कधी येतात अशी विचारणा त्यांच्याकडे केली. परंतु मिळकतीचे मालक यांनी उडवा-उडवीचे उत्तरे दिल्याने त्यांना आमचे अशिलांनी तारीख २७/०१/२०२२ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवून मिळकतीचे मालक यांना सदर मिळकतीची किंमत रक्कम रू.५०,००,०००/-रु. (रु.पन्नास लाख मात्र) एवढ्या रकमेने वाढवून देण्याबाबत कबुली दिली होती व वाढीव रकमेसहित तुम्ही सांगाल त्या तारखेस खरेदीखत करण्यास व उर्वरित रक्कम देण्यास तयार आहेत. अश्याप्रकारच्या मजकुराची नोटीस मिळकतीचे मालकांना पाठवून सदर खरेदीखत पूर्ण करण्यास मिळकतीचे सर्वजण मालक रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये सह्याकरण्यास कधी उपलब्ध आहात ते सदर नोटीस तुम्हास पोहोच झालेनंतर १५ दिवसांच्या आत आमचे अशिलांस लेखी पत्राने किंवा दिलेल्या नोटीसच्या उत्तराने कळवण्यास सांगितले होते. परंतु मिळकतीचे मालक नोटीस पाठवल्यानंतर अद्याप आलेले नाहीत.

आमचे अशिलांस मिळकतीचे मालक इतर कोणाशी व्यवहार करतील अशी दाट शक्यता वाटत असल्याने, मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलांबरोबर सदर मिळकतीचे खरेदीखत करून द्यावे या करिता, आमचे अशिलांनी साठेकरारची विशेष पूर्तता करून मिळणेकरता अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांचे न्यायालयात विशेष दिवाणी **दावा क्र.१४८/२०२२** हा दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये मे.कोर्टाने प्रती वादी (मिळकतचे मालक) यांचे विरूद्ध " issue show cause notice to defendant N0.1 to 9 as to why ad-interim injunction in favour of the plaintiff should not be granted as prayed, R/o 18/11/2022" अशी Order तारीख १०/१०/२०२२ रोजी केलेली आहे. सदर नोटीस मे. कोर्टाने दिल्यानंतर १०९ दिवसानंतर (मिळकतीचे मालक) प्र.वादी १ ते ९ यांनी सदर दाव्यास कैफियत व नि.५ च्या अर्जाला म्हणणे दिलेले नाही.

सदर बाबत आमचे अशिलांनी तारीख २३/०१/२०२३ रोजी नोटीस ऑफ लीज पेंडन्स अशी नोटीस सब रजिस्ट्रार अलिबाग यांचे कार्यालयात नोंदणीकृत केलेली आहे. सदर नोटीस दस्त क्र ३४१/२०२३ या नंबरकडे नोंदणीकृत केलेली आहे.

तरी,

या जाहीर नोटीसने सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांखेरीज अन्य कोणीही कोणत्याही प्रकारचा साठेकरार, खरेदीखत, बक्षीसपत्र, दान, गहाण, लीझ व अन्य कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये व हस्तांतरीत करू नये. या उपरही सदर मिळकतीबाबत अश्या स्वरूपाचा व्यवहार केल्यास तो व्यवहार बेकादेशीर होईल व या बाबत आमचे अशिल व्यवहार करणाऱ्या कंपनी, संस्था, इसमाविरूद्ध, वा अन्य कोणाही विरूद्ध कायदेशीर कारवाई करतील व त्याचे होणारे परिणामांस सर्वस्वी व्यवहार करणाचे हेच जबाबदार असतील याची नोंद घ्यावी.

कळावे.
अलिबाग
दिनांक:२७/०१/२०२३

अशिलातर्फे
सही/-
ॲड.जी.जी.गोंधळी
गोंधळी निवास, बाजारपेठ
अलिबाग जि.रायगड
मोबा. ८१४९९९७०७७

प्रोसेस फि

अर्जदार तर्फे वकिल
सचिन दि.पाटील

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

निशाणी नं.७/ड
दिवाणी चौकशी अर्ज क्र.०६/२०२३

१) नौशीन रिझवान हुर्झुक, वगैरे ....अर्जदार
विरूद्ध
कोणी नाही ....सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांचे पती २ व ३ याचे वडील व ४ यांचा मुलगा कै.रिझवान अब्दुल सत्तार हुर्झुक हे दिनांक २३/०९/२०२१ रोजी त्यांचे रहाते घरी मौजे माझेरी, पो.राजपुरी ता.मुरूड-जंजिरा जि.रायगड येथे मयत झाले आहेत. विविध सरकारी कार्यालयामध्ये सरकारी कामकाजाचेवेळी मयताचा वारसा दाखला मागितला जात असल्याने अर्जदार नं.१ ते ४ यांना कै.रिझवान अब्दुल सत्तार हुर्झुक यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला (सक्सेशन सर्टीफिकेट) मिळावे म्हणून अर्जदार क्र.१ ते ४ यांनी कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना अर्जदार क्र.१ यांचे पती २ व ३ यांचे वडील व ४ यांचा मुलगा कै. रिझवान अब्दुल सत्तार हुर्झुक यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तींची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दिनांक १८/०३/२०२३ पर्यंत स्वतंत्र किंवा त्यांचे वकिलामार्फत सदरचे अर्जाकामी कोर्टामध्ये हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार नं.१ ते ४ यांस त्यांचे मागणीप्रमाणे ते कै.रिझवान अब्दुल सत्तार हुर्झुक यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला 'सक्सेशन सर्टिफिकेट ' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यास येवून मे. कोर्टाकडून योग्य ते पुढील आदेश होतील.

आज दिनांक २४/०१/२०२३ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
वरिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
व.स्तर अलिबाग

गोल शिक्का

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व.स्तर.अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. बाळू रावजी पाटील यांचे मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असलेली खालील वर्णनाची जमिन मिळकत आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे - अंत्राट तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे. आर. पॉ.)	आकार (रू. पै.)
३०	४/अ/१०/ब	१.७५.00	0.९५

वर नमुद जमिन मिळकत हि ७/१२ सदरी श्री.आनंद नरहर सुगवेकर यांचे नावे हक्कनोंदीस आहे. मात्र सदरची मिळकत हि वाड-वडीलोपार्जीत काळापासून आमचे अशिलांचे वापरात, कसवणुकीत व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असून सदर मिळकतीमधुन मिळणाऱ्या उत्पन्नावरच आमचे अशिलांचा उदरनिर्वाह चालतो. आमचे वर नमुद अशिल हे सदरील मिळकतीचे विरूद्ध कब्जाने मालक झालेले असून तसा ठराव करुन मिळणेकामी आमचे अशिलांनी कर्जत येथील न्यायालयात दिवाणी दावा दाखल केलेला आहे. तरी सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणीही सदरील मिळकतीमध्ये आपले हक्क हितसंबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करु नयेत. तसेच सदर मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन आमचे अशिलांचे ताबेकब्जा वहिवाटीस अडथळा व हरकत करु नये. अन्यथा नाईलाजास्तव आमचे अशिलांना योग्य ती कायदेशीर कारवाई सुरु करणे भाग पडेल. तसेच सदर जमिन मिळकतीचे हस्तांतरणा संदर्भात कोणीही व्यक्ती, संस्था, कंपनी इ. यांनी कोणत्याही प्रकारचा करार-मदार केल्यास अथवा तसा प्रयत्न केल्यास तो आमचे अषिलांवर बंधनकार राहणार नाही.

दिनांक : २८/०१/२०२३

ॲड.तुषार रामचंद्र भवारे
०२, श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.लि.
ब्राम्हण आळी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९८५०८००८१३

शब्दकोडे क्र.२४



आडवे शब्द:

१. खऱ्या अपराध्याय सोडून निरपराध्याला शिक्षा देणे (म्हण) ९. सरकारी जमिनीची देखभाल करणारा अधिकारी १३. ढीग १४. केसांची बट १५. चपखल, एकदम बरोबर याअर्थी हल्लीचा शब्द १६. ठरलेल्या प्रमाणापेक्षा, मोबदल्यापेक्षा थोडे अधिकच! १८. धातूचा धागा २०. ही अंगाला फासणे म्हणजे संन्यास घेणे २२. व्रात्यपणा २३. दहाव्या राशीचा उभयचर २५. तफावत, अंतर २६. कामदेव २७. पाहुणचाराची सुरुवात याने होते २९. निषु केला ३०. खाण्

बालांगण

कमी खर्चात विमानप्रवास शक्य

अनेकांनी विमानातून प्रवास केला असेल. काही जण लवकरच करतील. मित्रांनो, तुम्हाला माहीत असेल की, विमानप्रवास बराच महाग असतो. पण येत्या काळात आपल्याला कमी खर्चात विमानाने प्रवास करता येणार आहे कारण उत्सर्जन कमी करणारे विमान तयार करण्यासाठी, चाचणी करण्यासाठी आणि त्याच्या सफल उड्डाणासाठी काम सुरू आहे. नासाच्या पुढाकारातून सुरू असणाऱ्या प्रकल्पात तयार होणाऱ्या या विमानांमुळे पर्यावरणाचे कमी नुकसान होण्यासोबतच इंधनाचीही बचत होईल. यामुळे हवाई प्रवासही स्वस्त होईल. अलिकडेच या प्रकल्पाचे मॉडेल दाखवले गेले. या विमानांमध्ये ट्रान्सोनिक ट्रस-ब्रेस्ड विंग संकल्पना वापरण्यात आली आहे. यामध्ये विमानाला अतिरिक्त लांब पातळ पंख असेल जो कर्णरेषेवर स्थिर राहील. या डिझाइनमुळे पारंपरिक विमानापेक्षा हे विमान कमी इंधनात अधिक प्रवास करेल. याशिवाय हे विमान बनवण्यासाठी अनेक हरित तंत्रज्ञानही वापरण्यात येणार आहे.

सध्या वापरात असलेल्या सर्वात कार्यक्षम विमानापेक्षा भविष्यातली ही विमानं ३० टक्क्यानं उत्सर्जन कमी करतील. मित्रांनो, इंधनाची बचत करणे केवळ पृथ्वीसाठीच फायदेशीर नाही, तर प्रवासखर्च कमी होणंही प्रवाशांसाठी लाभकारक आहे. याआधी १९७० च्या दशकात नासाने विंगलेट नावाचे तंत्रज्ञान आणले होते. पंखांच्या टोकांच्या उभ्या विस्तारांना विंगलेट म्हणतात. सध्या जगभरात सर्व प्रकारच्या विमानांमध्ये याचा वापर केला जात आहे. या तंत्रज्ञानामुळे इंधनाची बचत होते.

बदकांची हुशारी

असं का?

तुम्ही स्विमींग पूल किंवा बाथटबमधून बाहेर येता तेव्हा संपूर्ण भिजलेले असता. केस ओलेकंच असतात. शरीरावर पाण्याचे थेंब निथळत असतात. पण कधी बदकांना पाण्यात पोहताना पाहिलं आहे? यावेळी तुम्ही पहाल, पाण्यात असूनही ते भिजत नाहीत. त्यांचे पंख कोरडेच राहतात. का बरं असं होत? मित्रांनो, याचं रहस्य त्यांच्या पंखांमध्ये दडलं आहे. या पंखांमुळे बदकं पाण्यात असूनही भिजत नाहीत त्याचबरोबर पाण्यात तरंगत राहतात. तुम्ही पाहिलं असेल, पोहताना बदकं सतत चोचीने पंख स्वच्छ करत असतात. ते पंखांवर चोच फिरवतात त्यावरुन आपण ते पंख स्वच्छ करतात असं केवळ म्हणतो पण प्रत्यक्षात ते चोचीने पंखावर तेल फिरवत असतात. हे त्यांच्या तोंडात तयार होणारं तेल असतं. चोचीच्या सहाय्याने हे तेल पंखांवर पसरवलं जातं. तुम्हाला माहितीच आहे तेल आणि पाणी कधीच एकत्र मिसळत नाही. याच गुणधर्माचं सहाय्य मिळतं आणि बदकं पाण्यात असूनही भिजत नाहीत. पोहण्यासाठी बदकांना पायांचीदेखील मोठी मदत मिळते. आपण पॅडल बोटमध्ये पॅडलच्या सहाय्याने पाणी मागे ढकलतो आणि बोट पुढे जाते. अगदी त्याच पद्धतीने बदकं पडदा असणाऱ्या पायांच्या सहाय्याने पाणी मागे ढकलतात आणि पुढे पुढे जात राहतात. पण याच पायावरील त्वचेच्या पातळ पडद्यामुळे ती जमिनीवर नीट चालू शकत नाहीत.

शाकाहारी मांस!

मित्रांनो, जगातील लोक हळूहळू शाकाहाराकडे जात आहेत. परंतु जे लोक रोज मांसाहार करतात, त्यांना तो पूर्णपणे सोडून शाकाहार स्वीकारणे कठीण होऊ शकते. तुम्हीही त्यातील एक असाल आणि मांसाहार सोडून शाकाहारी व्हायचे असेल तर वनस्पती-आधारित मांसाहाराचा अवलंब करून हळूहळू या दिशेने वाटचाल करू शकता.

आता वनस्पती आधारित मांस म्हणजे काय ते समजून घेऊ या. मुलांनो, हे रंग, चव आणि संरचनेत मांसासारखे दिसते परंतु वनस्पती आणि धान्यांच्या मदतीने ते तयार केले जाते. हे शेंगा, कडधान्ये, खोबरेल तेल, गव्हाचे ग्लूटेन, सोयाबीन, वाटाणे, बीट रसाचा अर्क इत्यादी वनस्पती-आधारित पदार्थांपासून तयार केले जाते. जनावरांच्या दुधाऐवजी ओट्स आणि बदामापासून दूध तयार केले जाते. वनस्पती-आधारित मांसात प्राण्यांच्या मांसापेक्षा कमी कॅलरीज आणि संतृप्त चरबी असते. यात शून्य कोलेस्टेरॉल असते आणि ते फायबरने समृद्ध असते. हे वनस्पती आणि वनस्पतींपासून तयार केले जात असल्यामुळे त्यातील प्रथिने उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, कर्करोग आणि इतर दीर्घकालीन (तीव्र) आजारांची शक्यता कमी करतात. एवढेच नाही तर कडधान्ये वनस्पती-आधारित प्रथिनांचा उत्तम स्त्रोत असल्यामुळे हृदयविकार, मधुमेह इत्यादी आजारांचाही धोका कमी होतो. पचन सुधारणे, आतडी सुस्थितीत राहणे, वजन नियंत्रित करते यासारख्ये अनेक कामे यामुळे सहजी होतात. शिवाय पर्यावरणाच्या दृष्टिकोनातूनही या मांसाचे सेवन फायदेशीर आहे. म्हणूनच मांसाहार सोडून या वनस्पती आधारित मांसाचे सेवन आपल्याला अधिक आरोग्यसंपन्न ठेवेल याची खात्री बाळगा.

विश्वाचे आंगण...

मुलांनो, वातावरणात उपलब्ध असणाऱ्या घटकांमधून आपण शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या वातावरणात अशा शेकडो गोष्टी आहेत ज्या चांगली खेळणी म्हणून कामी करू शकतात. चला तर मग, त्यांची माहिती घेऊ या.

♦ तुम्हाला आवाजासह खेळायला आवडते. घरात येणारी भाजीही तुमच्यासाठी चांगले खेळणी ठरू शकते. तुमच्यामध्ये गोष्टींचे वर्गीकरण करण्याची नैसर्गिक प्रवृत्ती असते. तेव्हा खेळायला बटाटा, टोमॅटो, वांगी, बीटरूट इत्यादी मोठ्या आकाराच्या भाज्या घ्या. आपल्या लहान भावंडांना ही भाजी वेगळी करू द्या. तुम्ही त्यांना काही भाज्या एकत्र ठेवण्यासही सांगू शकता. या खेळात तुम्हीही रमाल तुमचं लहान भावंडंही रमेल.आई स्वयंपाक करत असताना तिच्याकडून पिठाचा गोळा घेऊन तुम्ही त्याचे अनेक आकर्षक आकार बनवू शकता. हाही छान खेळ आहे.

♦ फळे आणि भाज्यांसह, पाने देखील एक चांगले खेळणे आहे. घराभोवती उपलब्ध असणारी विविध प्रकारची पाने आणा आणि त्याचे आकार बघा. वेगवेगळ्या आकारांची पाने स्वतंत्रपणे लावा. ते कोणत्या झाडाचे पान आहे याबद्दलही तुम्ही एकमेकात चर्चा करू शकता. झाडांच्या काठीनेही खेळता येतो. फुले खेळणी म्हणूनही काम करू शकतात. हा केवळ एक खेळ नाही तर आपल्या पर्यावरणाबद्दल जागरूक राहण्याचा आणि आपल्या सभोवतालची परिस्थिती जाणून घेण्याचा हा एक चांगला मार्गही असू शकतो.

♦ छोट्या वस्तूंची वर्गवारी करण्याचा खेळ वेगळीच मजा देतो. त्यासाठी जिरे, राजमा, विविध प्रकारच्या कडधान्ये अशा घरात उपलब्ध असणाऱ्या अनेक गोष्टी एकत्र करून त्या वेगळ्या करा. काकडी वेगवेगळ्या आकारात कापा. त्यावर कार्व्हिंग करा. यामुळे तुम्ही क्रिएटिव्ह व्हाल.

♦ आपल्या वातावरणात वाळू, पाणी आणि माती ही उत्तम संसाधने उपलब्ध आहेत. ही सामग्री उत्तम खेळणीही आहेत. तेव्हा माती मळा आणि छान छान आकार घडवण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी माती वस्त्रगाळ करा. वालुशिल्प घडवण्याचा प्रयत्न करुन पहा. यात तुम्ही रंगून जाल.



गृहपाठ हवा की नको?

मित्रांनो, गृहपाठ आवश्यक आहे की नाही, या विषयी मोठी माणसं बराच विचार करत असतात. सध्या यावर बरीच चर्चाही घडत आहे. तुम्हीही ती ऐकत असाल. तर मग तुम्हाला याबाबत काय वाटतं?

नऊ वर्षांचा प्रद्युम्न सांगतो की, गृहपाठ आवश्यक आहे. शाळेत काहीतरी नवीन शिकतो तेव्हा घरी त्याचे पुनरावलोकन केल्याने विषय लक्षात ठेवण्यास मदत होते असे तो म्हणतो. 'माझ्या शाळेत शिक्षक गणित आणि भाषा विषयांचा गृहपाठ देतात. गणितात बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार शिकतो. भाषाकलांमध्ये आम्ही शब्दलेखन, वाचन आणि लेखन शिकत आहोत. गृहपाठ आमच्या शिक्षकांना मौल्यवान माहिती देतो. विद्यार्थी वर्गात किती लक्ष देत आहेत आणि कोणाला अतिरिक्त मदतीची आवश्यकता आहे, हे गृहपाठावरुन कळते. त्यामुळेच शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर गृहपाठ महत्त्वाचा असतो'.

सुरभी म्हणते की, विद्यार्थ्यांना गृहपाठ देणे ही वाईट कल्पना आहे. निरोगी मन आणि शरीर तयार करणाऱ्या अनुभवांसाठी मुलांना शाळेनंतर वेळ हवा असतो. गृहपाठामुळे मुलांवर ताण येऊ नये. हे त्यांना वाढण्यास मदत करण्यासाठी आहे. पण गृहपाठाचा ढीग होतो, तेव्हा विद्यार्थी तणावग्रस्त होतात आणि तणावग्रस्त मनाने निर्माण केलेल्या गृहपाठाची गुणवत्ता कमी असते. गृहपाठ खराब करणे हे गृहपाठ न करण्यापेक्षा वाईट आहे. जोपर्यंत विद्यार्थी वर्गात कठोर परिश्रम घेत आहेत, तोपर्यंत त्यांना अतिरिक्त काम न देणे चांगले. शिक्षण त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठीही आहे आणि त्यांचा आनंद त्यांना मिळायला हवा.

मुलांनो, आपल्या या मित्रांनी त्यांची मते सांगितली. तुम्हाला काय वाटतं?

माहीत आहे?

अनोखे आविष्कार

❖ रेल्वेचं सगळ्यात पहिलं इंजिन रिचर्ड ट्रेविथिक यांनी बनवलं होतं. मात्र १८२९ मध्ये प्रवाशांना घेऊन ज्या रेल्वेने प्रवास केला त्याच्या इंजिनाचं नाव होतं रॉकेट. ते इंजिन जॉर्ज स्टिव्हेसन यांनी बनवलं होतं.

❖ लंडनमध्ये १८६३ मध्ये पहिली भूमिगत रेल्वेगाडी चालवली गेली. ही गाडी वाफेच्या इंजिनावर चालवली गेली.

❖ गरम हवेमुळे उडणारा फुगा १७८३ मध्ये सर्वप्रथम उडवण्यात आला. मॉण्टगोल्फर बंधूंनी हा प्रयोग यशस्वी केला होता.

❖ वीजेवर चालणाऱ्या बल्बचा आविष्कार थॉमस एडिसन याने १८७३ मध्ये केला.

जिज्ञासा

ओळखा पाहू...

१) बार्लीचं सर्वाधिक उत्पादन कोणत्या देशात होतं?
२) काळ्या मातीत कोणतं पीक घेतलं जातं?
३) गेट वे ऑफ इंडिया कुठे आहे?
४) देशातलं सर्वात मोठं बंदर कोणतं?
५) कोणत्या शहराला गुलाबी शहर म्हटलं जातं?
६) लोहाच्या कमतरतेमुळे होणारा विकार कोणता?
७) कॉफी बोर्ड ऑफ इंडियाचं मुख्यालय कुठे आहे?
८) गोड्या पाण्याचं भारतातलं सर्वात मोठं सरोवर कोणतं?
९) क्लोरोफॉर्मचं रासायनिक नाव काय?
१०) हिंदुस्तान शिपयार्ड कोणत्या शहरात आहे?

उत्तरं: १)रशिया २)कापूस ३)मुंबई ४)मुंबई ५) जयपूर ६)अॅनिमिया ७)बंगळूरु ८) कोलकाता ९) ट्रायक्लोरोमिथेन १०)विशाखापट्टणम

चित्र रंगवा

ठिपके जुळवा



वेगवेगळ्या भाषा शिकायच्या आहेत?

टेक फन

छोट्या दोस्तांनो, तुम्ही भारताचे नागरिक आहात. यासोबतच या जगाचेही नागरिक आहात. आपल्या प्रत्येकाचं जग एक आहे. आपल्या प्रत्येकाची स्वप्नं आहेत. आयुष्याचं एक ध्येय आहे. आपण सगळे एकत्र येऊ शकतो. हे जग एक असलं तरी प्रत्येकाची भाषा वेगळी आहे. भारतातही वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. एकमेकांशी बोलायचं, संवाद साधायचा तर या भाषा जाणून घेणं गरजेचं आहे. एकापेक्षा जास्त भाषा येत असतील तर तुम्ही लोकांशी सहज संवाद साधू शकता. chillola.com या साईटद्वारे तुम्ही वेगवेगळ्या भाषा शिकू शकता. या साईटच्या माध्यमातून तुम्ही जगभरातल्या मुलांशी संवाद साधू शकता.

इंग्रजी ही जगाची भाषा मानली जाते. अनेक देशांमध्ये इंग्रजी बोलली जाते. त्यामुळे इंग्रजी येत असेल तर संवाद साधणं फारसं कठीण जात नाही. chillola.com या साईटवर इंग्रजीसोबतच स्पॅनिश, जर्मन, फ्रेंच आणि इटालियन या भाषा शिकता येतील. आपली कला, कविता आणि लेख इथे शेअर करता येतील. ही साईट पूर्णपणे मोफत आहे. इथे नवी भाषा शिकण्याची संधी मिळू शकते.

ही साईट ओपन केल्यावर वेगवेगळे विभाग दिसतील. किड्स गॅलरी, वर्कशीट, ग्रेट वेबसाईट्स, इंग्लिश फॉर किड्स, स्पॅनिश फॉर किड्स, फ्रेंच फॉर किड्स, जर्मन फॉर किड्स, इटालियन फॉर किड्स असे वेगवेगळे विभाग या साईटवर आहेत. इंग्लिश फॉर किड्स या साईटवर गेल्यावर तुम्हाला या भाषेचं प्राथमिक ज्ञान मिळू शकेल. यासोबतच वेगवेगळे देश, संस्कृती, परंपरा याबद्दलही शिकता येईल. नवी भाषा शिकायची आवड असेल तर या साईटला भेट द्यायला हरकत नाही. मुलं आणि त्यांच्या पालकांसाठी या साईटची निर्मिती करण्यात आली आहे. नव्या भाषेची तोंडओळख करून घ्यायची असली तरी या साईटला भेट देता येईल. गंमत म्हणजे तुम्ही या साईटवर तुमची चित्रं, कविता पाठवू शकता. या साईटला भेट दिल्यावर जगभरातल्या मुलांशी मैत्री करता येणार आहे. काही चांगलं शिकायचं असेल तर chillola.com हा चांगला पर्याय आहे.

लक्षात ठेवा

काम होईल सोपं

बरेचदा आई-बाबा तुमच्यावर घरातल्या एखाद्या कामाची जबाबदारी सोपवतील. एरवीही तुम्ही आईला मदत म्हणून छोटं-मोठं काम करत असालच. बरेचदा तुम्हाला स्वच्छतेचं काम सांगितलं जातं. आई तुम्हाला खिडक्या पुसून घ्यायला सांगते. हे काम सोपं करण्यासाठी एक मंत्र आज जाणून घेऊ या. काचेवर पडलेले डाग पुसण्यासाठी कापडापेक्षा कागद वापरणं जास्त चांगलं. कारण कागदाचे डाग पडत नाहीत शिवाय सगळे डागही निघून जातात. म्हणूनच खिडक्या पुसण्यासाठी आधी साबणाचं पाणी करुन घ्या. कापडाच्या सहाय्याने ते खिडकीवर पसरवा आणि रद्दी कागद घेऊन काचा पुसून घ्या. यामुळे खिडक्या चकाचक होतील आणि तुम्ही शाबासकी मिळवाल. काचेची कोणतीही वस्तू स्वच्छ करण्यासाठी तुम्ही हा उपाय अवलंबू शकता.

नोंद घ्या

टाकाऊ नव्हे, टिकाऊ

आपल्या घरात, कपाटात खूप सामान साचून राहिलेलं असतं. तुमच्या कपाटातही असं अनावश्यक सामान भरलेलं असेल. एखाद्या वेळी ते आवराल तेव्हा नको असलेलं सामान टाकून देण्यासाठी बाहेर काढाल, पण काही गोष्टी टाकून देऊ नका. कारण त्या कोणत्या ना कोणत्या कामासाठी उपयोगी पडतील. तुमच्या कपाटात जुनी वॉलेट पडून असतील तर टाकून देऊ नका. ही वॉलेट खिळ्याच्या सहाय्याने दाराच्या मागच्या बाजूला किंवा भिंतीवर लटकवून ठेवा. त्याला तुम्ही इअररिंग्ज, क्लिप्स, पिना, टाचण्या असं काहीबाही अडकवून ठेवू शकाल. जुन्या गमबुटांमधून माती भरुन तुम्ही रोपं लावू शकता. जुनी दप्तरं टाकून न देता त्यात पुढच्या वर्षी उपयोगी येणारं शालेय साहित्य एकत्र ठेवून द्या. जुन्या जीन्स आल्टर करुन शॉर्टस बनवून घ्या. जुने टी शर्ट तुम्ही डस्टर म्हणून वापरु शकता.

तिघे वयस्कर मित्र एक निश्चय करतात आणि चक्क एव्हरेस्ट शिखरावर जातात. सिनेमामध्ये हे सगळं ठीक आहे. पण प्रत्यक्षात ही उँचाई गाठणं शक्य आहे काय?

खरी 'उँचाई' कशात?

अश्विनी मुळे

दिल्लीत रहाणारे चौघं सुखवस्तू मित्र असतात. स्वभाव वेगळे, व्यवसाय वेगळे, पण मैत्री अतूट. त्यातला एक जण अकस्मात हरपतो. हिमालयात जन्मलेला, वाढलेला, जिंदादिल इन्सान. त्याचं स्वप्न असतं आपल्या या तिघा मित्रांना हिमालयात न्यायचं. त्या दैवी भव्यपणाशी त्यांची ओळख करून द्यायची. त्यांना खरा स्व सापडवून द्यायचा, म्हणजे त्यांच्यातला खोटा स्व गळून पडेल.

आता उरलेल्या तिघातला एक हे स्वप्न पूरं करायचा निश्चय करतो. कारण त्या पहाडी मित्राने चौघांसाठी प्लॅन केलेल्या टूरची तिकिटं त्याला सापडतात. तो प्रवास असतो Everest Base Camp पर्यंत जाणारा. My God. बाकीचे दोघे आधीच गळफटतात. पण त्यांना गेलेल्या मित्राच्या आणा शपथा घालून हा तयार करतो. त्यांच्या कुटुंबियांना सुगावा न लागू देण्याच्या असंख्य युक्त्या लढवतो. आणि as expected त्यांचं मिशन कामयाब होतं.

अर्थात सिनेमाची गोष्ट सांगणं हा माझा आजचा विषय नाहीये, तर त्या सिनेमाने माझ्या मनात निर्माण केलेले असंख्य सवाल तुमच्यापुढे मांडायचे आहेत.

आमचा एक मित्र आहे. एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जावं इतक्या सहजतेने आणि इतक्या संख्येने तो सह्याद्रीतले ट्रेक करत असतो. तोसुद्धा जेव्हा पहिल्यांदा हिमालयात गेला, बऱ्यापैकी तरुण वयात हं, तेव्हाही, त्याच्याच शब्दात सांगायचं तर एकेका चढाउतारावर त्याची तंतरली. आणि इकडे हे सिनेमातले तीन ज्येष्ठ नागरिक. त्यांना ट्रेकिंगची कसलीही पार्श्वभूमी नाही. तयारीला जेमतेम दोन महिने. आणि तयारी काय तर काहीतरी डायेट आणि जेमतेम चालणं. भरीला वयानुसार आलेल्या व्याधी.

ज्या गृपबरोबर हे जाणार असतात तो संपूर्ण तरुणांचा. हे तिघंच फक्त वयस्क. त्यांना बरोबर घेऊन जाण्याच्या प्रयत्नात सगळं आखलेलं टाईमटेबल कोलमडत असतं. गृपलीडर मुलीची चिडचिड होत असते. एक जण घसरून पडतो. एकाच्या महत्वाच्या औषधाच्या गोळ्या संपतात. (इतका निश्चय, इतकं प्लॅनिंग असूनही हा प्रकार कसा काय होतो बुवा?) इमर्जन्सी निर्माण होते. तोच नंतर थोडा वेळ हरवतो. हे तिघं भराभर चालू शकत नसल्याने उशीर होऊन सर्वजण वादळपावसात सापडतात.

हा सिनेमा असल्याने लुटुपुटुची असली संकट तशीच थातुरमातुर पद्धतीने ओसरतात. पण प्रत्यक्षात असले प्रकार झाले तर हिमालयात त्यांना क्षमा असेल कां? हे बघताना मला 'Everest' सिनेमातला एक प्रसंग आठवला जो अजून माझ्या काळजात रुतुन आहे. एव्हरेस्ट सर करायला निघालेल्या एका गृपमधे असेच एखाददोन हवशे नवशे असतात. शिखराजवळ पोचत असतानाच गृपलीडरला समजतं की एक वादळ येऊ घातलंय आणि शिखर सर करून सुरक्षित ठिकाणी उतरण्यासाठी आपल्याकडे फक्त दोन तास आहेत. अतिशय कौशल्याने हे भान सांभाळण्यात तो यशस्वी होतच असतो, तेवढ्यात एक ज्येष्ठ मागे राहिलेला दिसतो. लीडर त्याला धोक्याची कल्पना देत परत घेऊन निघतो. पण तो गृहस्थ कसंही करून शिखर गाठणारच म्हणून हटून बसतो. शेवटी लीडर असल्याने त्याला साथ सोडता येत नाही. आणि अखेर भयंकर वादळात सापडून, सॅटेलाईट फोनवरून दूरदेशी असलेल्या आपल्या गरोदर बायकोशी बोलत बोलत हा उमदा, शूर तरुण प्राण सोडतो. ऐकणारा सारा कँप सुन्न, हताश होतो.

एकाच्या हट्टीपणाची सजा दुसरा भोगतो. हे लिहिताना त्याचा चेहरा माझ्या डोळ्यात पाणी आणतोय.

अलिकडे हे असले मोटिव्हेशनल सिनेमे, नाटकं, साहित्य मला झेपत नाही. खास करून वयस्करांच्या बाबतीतले. एखाद दुसऱ्याला असं काही जमतंही. माझी एक मैत्रिण, सत्तरपार. आणि टकाटक सिंहगड चढते. But all are not cut for that. पण अशा प्रचाराला बळी पडून नसती धाडसं करणारे आपला आणि दुसऱ्याचा जीव धोक्यात घालतात. अगदी तितकी वेळ नाही आली तरी दुसऱ्यांना चिंतेत टाकतात. ठरलेलं शेड्यूल बदलायची वेळ आणतात. गृपलीडरचं ऐकण्याची शिस्त न पाळता मनमानी करतात. आणि दुर्दैवाने तो सिनेमा नसतो. तिथे सिनेमात लावलेल्या सेटवर चालत, चढत हिमालयाचा आभास निर्माण करणारा अभिनय करायचा नसतो. तर खऱ्याखुऱ्या प्रसंगांना तोंड द्यायचं असतं.

पण यातर टोकाच्या गोष्टी झाल्या. रोजच्या आयुष्यातही अट्टाहास करणारे वृद्ध पाहिले की मला त्यांच्या कुटुंबियांची दया येते. केवळ माझ्या वयाची दुसरी व्यक्ती या वयातही अमुक एक करते, तर मी कां नाही, या इर्षेपोटी स्वतःसकट कुटुंबाला अडचणीत टाकणाऱ्या माणसांना काय म्हणावं? अहो, तुम्हाला so called motivate करणारे लोक त्यातुन उद्‌भवलेल्या अडचणी नी आजारपणं निभवायला येणार नाहीत, तर तुम्हाला समजुतीचे चार शब्द सांगणारी तुमची मुलं नातवंडंच ते भोगणार आहेत. कुठलेही आग्रह धरताना स्वतःची तब्येत, परिस्थिती साऱ्याचा विचार करा. नसत्या कहाण्यांना बळी पडू नका. आपण आनंदी आणि सुरक्षित रहा आणि तुमची काळजी घेणाऱ्यांनाही आनंदी ठेवा. छोटेमोठे समारंभ, प्रवास, खाणंपिणं आपली प्रकृती आणि क्षमता लक्षात घेऊनच करा. उगीच 'सगी नाचली म्हणून बगी नाचली' असं करू नका. तरुण पिढीला तुमचा उपयोग होऊ दे, उपद्रव नको. माझ्या सासूबाईंना पोटाचा त्रास असल्याने त्या कडक पथ्य पाळत. मलाच वाटे की घरात इतके पदार्थ बनतात, त्या स्वतःही ते करतात, तर घासभर तरी त्यांनी खावेत. पण अंगभूत सौम्यपणाने दिलेला त्यांचा नकार मात्र ठाम असे. अगं, मलासुद्धा सगळं खावसं वाटतं, पण मग मी आजारी झाले की ते हॉस्पिटल, तुमच्या रजा, तुमची धावपळ हे नको वाटतं. सासरेही तसेच आणि माझे यजमानही त्याच वृत्तीचे. हे आपल्याभोवतीचे अनुभव टिपत रहावं. काय घ्यावं, काय टाकावं याचा विवेक बाळगावा. नसत्या गोष्टींना भुलू नये. प्रसंगी मनमानी न करता खाली रहाण्यातच खरी उँचाई गाठता येते.

हसता हसता रडवणारा 'फनरल'

एखाद्या चित्रपटाबद्दल काहीच माहित नसावं. सहज सर्फिंग करत असताना पाहु तरी काय आहे असं म्हणून चित्रपट सुरु करावा आणि अतिशय सुंदर चित्रपट हाती लागावा ! फनरल हा चित्रपट पाहताना असेच वाटले. खूप दिवसांनी एखादा चित्रपट पाहताना डोळ्यातून पाणी येईपर्यंत हसलो. हसता हसता अनेकदा डोळ्याच्या कडाही पाणावल्या.

अगदी पहिल्या फ्रेममधेच पुलाखाली ताशाच्या तालावर शाळेच्या गणवेशातील नाचणारी पोरं दिसतात. एक मुलगी त्यातल्या एकाच्या कानात काहीतरी सांगून जाते आणि ती मुलं तिथून लगेच निघतात. पुढच्याच फ्रेममधे एक अंत्ययात्रा चाललीय आणि ही मुलं त्या अंत्ययात्रेत उधळलेले पैसे गोळा करत त्याच्या मागून चाललेली असतात. पुरेशी चिल्लर जमा झाल्यावर मग ही कार्टी दुकानात जातात. एका दुकानात जाऊन लिमलेटच्या गोळ्या मागतात. चिल्लरला लागलेल्या फुलांच्या पाकळ्या पाहून दुकानदार पण हादरतो.

लिमलेटच्या गोळ्या खिशात टाकून तिथून निघतात आणि पुन्हा अंत्ययात्रेच्या मागे चालू लागतात. चालत असताना अंत्ययात्रेत चालणाऱ्या लोकांचे कानावर पडणारे संवाद ऐकण्यासारखे. विसाव्यासाठी अंतयात्रा थांबते आणि या चारातला एक मुलगा हिरा पुढे जातो. खिशातल्या गोळ्या काढतो आणि तिरडीवर असलेल्या म्हातारीच्या देहावर ठेवतो. त्याचा मित्र म्हणतो आज्जी गोळ्या खाईल का रे? हिरा म्हणतो अरे खाईल ना, खूप आवडायच्या आज्जीला. सारखी गोळ्या चघळत बसायची.

अंत्ययात्रेचे पैसे गोळा करुन लिमलेट घेणारी टारगट पोरं म्हणून आपण मनातल्या मनात त्यांना स्टँप

करेपर्यंत पुढच्याच या प्रसंगाने आपण स्तिमित होऊन जातो. आपण थोडं इमोशनल वगैरे होतो न होतो तोपर्यंत लगेच पोराचे आजोबा त्या पोराच्या पाठीत धपाटा घालतात आणि पोरगं आज्याला डिवचून त्यांची चप्पल घेऊन पळून जातं ! या फ्लॅशबॅकमधल्या प्रसंगापासूनच चित्रपट वेगळा आहे याची चुणूक मिळते. पडद्यावरच एक छोटी फ्रेम दाखवून हा फ्लॅशबॅकही अगदी खुबीने दाखवलाय.

प्रशांत साजणीकर

मृत्युसारखा अतिशय गंभीर विषय हाताळताना त्यात प्रेक्षकांवर कुठेही इमोशनल अत्याचार न करणे किंवा विनोदाची पेरणी करत असताना थिल्लरपणा येऊ न देणे तसेच उगाच प्रेक्षकांना उपदेशाचे डोस पाजून चित्रपट प्रिची न होऊ देणे हे अतिशय कठीण काम. पण दिग्दर्शक विवेक दुबे यांनी ही जबाबदारी अतिशय लीलया पेलली आहे. यासाठी त्यांना शंभर पैकी शंभर गुण द्यायला हवेत.

कथा, पटकथा आणि संवाद या सर्व आघाड्यांवर रमेश दिघे यांनी बाजी मारली आहे. चुरचुरीत आणि प्रवाही संवादांमुळे चित्रपटाला चार चांद लागले आहेत.

विजय केंकरे आणि प्रेमा साखरदांडे सोडले तर एकही नावाजलेला कलाकार यात नाही. पण सर्व कलाकारांनी अप्रतिम कामं केली आहेत. प्रेमा साखरदांडे यांनी साकारलेली मोरे आजी खासच. शाहीर संभाजी भगत यांनी साकारलेली कचरुची भुमिकाही लक्षवेधी. आरोह वेलणकर यांनी हिराच्या प्रमुख भुमिकेत अक्षरशः जान ओतली आहे. फारच गुणी कलाकार आहे हा. तसेच हर्षद शिंदे (सुर्या), पार्थ घाटगे (विनोद), सिध्देश पुजारी (सदा) या सर्वांची कामं फार सुंदर झाली आहेत. मिनलच्या संयत भुमिकेतली तन्वी बर्वेसुध्दा छाप पाडून जाते. या चित्रपटातला विनोद खास आवडला. इतका सहज सुंदर, चपखल आणि नंतरही आठवण येऊन उगाचच एकट्याने हसायला लावणारा विनोद अनेक वर्षात मी तरी मराठी चित्रपटात पाहिलेला नाही. आजची सोय करतंय कोण, आजचं बील भरतंय कोण सारखं मित्रांच मजेशीर रॅप आठवून हसू येतं. आजोबा आणि नातवाचं नातं, मोरे आजी आणि हिराचं नातं, चार मित्रांचं नातं फार सहज आणि म्हणूनच जास्त हृदयाला भिडणारं झालं आहे. यातल्या अनेक फ्रेम्स, संवाद आणि दृश्ये नंतरही मनात रेंगाळत राहतात. मीनल आणि हिराचं हळूवार फुलणारं नातंही इतक्या अप्रतिम रितीने दाखवलंय की बास्स! चित्रपटात अनावश्यक पार्श्वसंगीत नाही की एकही गाणं नाही. मागच्या वर्षी आलेला हा चित्रपट. नेटवर माहिती घेतली असता या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट सामाजिक चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचे समजले. इतका सुंदर चित्रपट कसा काय नजरेतून निसटला काय माहित.

ऋषिकेश पाळंदेची गोष्ट

जगण्याचा अर्थ आपल्या नजरेतून शोधू पाहणारा, त्याच भूमिकेतून शहरी समृद्धीकडे पाठ फिरवून गावातील कष्टप्रद जीवन जगणारा लेखक हृषीकेश पाळंदे.

हृषीकेश हा पुण्यातला, एका मध्यमवर्गीय सवर्ण कुटुंबात जन्मलेला.. कोकणातल्या एका छोट्या खेड्यात जाऊन राहातोय..

बौद्धिक आणि शारीरिक श्रमाच्या सीमा चोखाळत.. कधी लेखक असतो तर कधी दलित वस्तीत रोजंदारीवर काम करणारा एक गडी..

त्याचा जन्म १९८५ चा, तो पुण्यातच शिकला आणि वाढला. BSC Statistics पूर्ण केलं पण त्याआधी आणि त्यानंतर बऱ्याच गोष्टी-शिक्षण, नोकऱ्या अधर्वट सोडल्या. सतत... काय करणार आहेस तू? या प्रश्नाला वैतागून २०११ साली अहमदाबाद ते जम्मू असा १९०० चा एकांडा सायकलचा प्रवास त्याने केला. त्या प्रवासातल्या अनुभवातून जगण्याविषयीचे आणि स्वतःबद्दलचे अनेक interesting प्रश्न त्याला पडले.

शाहीन इंदुलकर

डोक्यातला त्या गुंत्यातून त्याने एक पुस्तकंच लिहिलं, 'दोन चाकं आणि मी'. त्याच्या या पहिल्याच पुस्तकाला २०१४ साली महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार मिळाला. पुढे त्याच्या तीन कादंबऱ्या आल्या.

'बयो', ज्यात शहरी मुलगा गावात जातो.. अनेक अनुभव घेत समाजातल्या विषमतेकडे, मनातल्या गोंधळाकडे कटाक्ष मारत जगून बघतो आणि पुढे कंटाळतो. पुढे याच कादंबरीचा sequel 'भरकटेश्वर' नावाने येतो, ज्यात शहरी मुलगा गावात राहून बघतो, कंटाळतो भरकटत- भरकटत परत शहरात येतो. सगळं तळ्यात-मळ्यात असतं.

त्याची recent कादंबरी ही 'झुरांगलिंग', लेह-लडाखच्या पार्श्वभूमीवरची एक गोष्ट.. २०१७ साली कुसुमाग्रज प्रतिष्ठान (नाशिक) यांच्या शिष्यवृत्तीमुळे तो ती लिहू शकला. तर हा त्याचा २०१२ साली सुरू झालेला लेखनाचा प्रवास चालूच आहे आणि त्याच प्रकारे गरजेपुरतं जगणंही. जगण्यासाठी हाता- पायाने काम करणं ही चालूच आहे. कोणत्याही social media वर न सापडणारा हा लेखक, खूप observant आणि तितकाच बोलका आणि मिश्किल आहे. त्याचं जगणं जितकं मोकळं, तितकंच त्याचं लिखाण हे थेट हृदयाला भिडणारं आहे. त्याच्या या जगण्यावर प्रभाव आहे, तो बुद्धाने सांगितलेल्या मध्यम मार्गाचा.

साने गुरुजी स्मारक, माणगाव येथे मित्र मेळाव्याच्या निमित्ताने मला ह्या अवलिया तरुण लेखकाची (आणि माझ्या मित्राची) मुलाखत घेण्याचा योग आला.

खालील link वर आपण त्याचा प्रवास समजून घेऊ शकतो...

(साभार)

गणितक्रांती

पडदा उघडतो तेव्हा.. रंगमंच मोकळाच आहे. विंगेतून एक मुलगा धावत धावत येतो. आजूबाजूला बघतो आणि मग थेट प्रेक्षकांकडे पाहात बोलू लागतो..)

(एक हात ऊंचावून..) नमस्कार..

लहानपणापासून मी लोकांमधे असणारे समज-गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न करतो आहे. थोडक्यात सांगायचं तर.. (आवाज बदलून) मी क्रांती करतोय.. आणि..(खूप मोठा पॉज घेऊन)

'क्रांतीकारकांच्या वयाकडे पाहू नका त्यांचे विचार ऐका' ही चिनी म्हण तुम्हाला माहितच असेल. आणि म्हणूनच आज मी तुम्हाला माझा एक क्रांतीकारी विचार रुजवताना माझं कसं कौतुक झालं हे सांगणार आहे.

शाळेचा पहिला दिवस. पहिलाच तास गणिताचा. जोशी सर गणित शिकवायला आले.

ते म्हणाले, 'आज आपण नफा तोट्याची गणितं शिकूया.'

नंतर ते मंत्र म्हंटल्याप्रमाणे बोलू लागले, 'खरेदीची किंमत वजा विक्रीची किंमत, आणि विक्रिची किंमत अधिक खरेदीची किंमत आणि ही किंमत आणि ती किंमत म्हणजे तो नफा व तो तोटा.. कारण तोटा असतो खोटा..'

हे मला असह्य होऊन मी ताडकन उभं राहात म्हणालो, 'बस्स बस्स! आता गणित घाला.'

हे ऐकताच वर्गातील मुले माझ्याकडे भिऊन



तर जोशी सर माझ्याकडे आदराने पाहू लागले. त्यांना क्षणभर बोलताच येईना.

मी उजवा हात पुढे करुन म्हणालो, सर गणित घाला.. त्यात आमचाच नफा आहे!

सर म्हणाले घ्या गणित... गणपतने बाजारातून १३७ रुपये आणि ५० पैशाला सहा कप बशा आणल्या. पण आणताना त्याच्या हलगर्जीपणामुळे त्यातील चार कप आणि एक बशी फुटली तर एकूण तोटा किती झाला?'

हे गणित ऐकल्यावर वर्गातील सर्व मुले जणूकाही चिनी भाषेतील एखादे गाणे ऐकल्या सारखे तोंड उघडं टाकून जोशी सरांकडे पाहू लागली. पण मी न भिता जोशी सरांना विचारलं, 'सर.. या गणिताची मला चार उत्तरं माहित आहेत.'

हे ऐकताच 'आपल्या वर्गातला बृहस्पती पाहून' मुलांचे डोळे चमकले!

राजीव तांबे

जोशी सर माझ्याजवळ आले. माझ्या डोळ्यात वेडाची झांक आहे? की प्रखर बुध्दीमत्तेचं तेज आहे? हे नीट निरखून पाहू लागले.

जोशी सर अस्पष्टपणे पुटपुटत म्हणाले, 'प.. पण एका गणिताला एकच उत्तर..'

जोशी सरांना झटक्यात थांबवत मी म्हणालो, (जोरात ठासून बोलतो) थांबा. हा गैरसमज आहे! हेच मला मोडून काढायचं आहे! मला गणितात क्रांती करायची आहे! सर मला संधी द्या..

जोशी सर दोन पावलं मागे गेले.

आणि त्यांनी काहीही न बोलताच मानेने खूण केली.. बोल बोल.

मी बोलू लागलो.. (प्रेक्षकांकडे पाहात बोलू लागतो) म्हणजे.. तुम्हाला समजतंय ना? मी गणित क्रांती हलकेच उलगडून सांगू लागलो..

उत्तर पहिले : सर.. जरी चार कप आणि एक बशी फुटली असली तरी तोटा नव्हे तर शंभर टक्के पेक्षाही जास्त फायदाच झाला आहे!

हे ऐकताच वर्गातील काही हुशार मुले किंचाळली आणि हे काय?

सर थरथरत म्हणाले, कसं क्कीय?

'अगदी सोप्पं आहे सर. जर सहा कप बशा असत्या तर किती माणसं चहा प्यायली असती?'

मुले ओरडली, 'सर्हीी सर्हीी'

'बरोब्बर! पण आता दोन कप आणि पाच बशा असल्याने किती माणसे चहा पितील?'

वर्गात शांतता पसरली.

मी म्हणालो, आता दोन माणसं कपातून आणि पाच माणसं बशीतून चहा पितील. म्हणजे सहा पेक्षा जास्त! म्हणजे शंभर टक्के पेक्षा जास्तच फायदा!' हे ऐकताच वर्गातल्या मुलांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

मुलांना शांत करत मी म्हणालो, 'सरांनी आपल्याला विचारलं आहे की, तोटा किती झाला? सांगा बरं..?'

पुन्हा एकदा वर्गात सन्नाटा पसरला.

मी म्हणालो, 'सोप्पं आहे! आपण या गणिताचं उत्तर शंभर टक्के तोटा.. असं पण काढू शकतोच की..

सगळी मुले ओरडली, कसे काय?'

अगदी सोप्पं..

अहो उरलेल्या कप बशा फटाफट फोडून टाकल्या की झालाच ना शंभर टक्के तोटा? काय?

मुलांनी आनंदाने पुन्हा एकदा टाळ्या वाजवल्या. आणि जोशी सर कपाळावरचा घाम पुसत म्हणाले, हे..ही जरा फारच झालं.'

मी म्हणालो ठीक आहे. तुम्हाला शंभर टक्के नफा हवा आहे का?

मुले ओरडली हॉीी हॉीी हवा आहॉीी!

मी म्हणालो हरकत नाही. आता एवीतेवी सगळ्या कपबशा फुटल्याच आहेत. तेव्हा गणपतच्या पगारातून १३७ रुपये आणि ५० पैसे कापून घ्या आणि त्याला नवीन कपबशा आणायला सांगा. झाला की शंभर टक्के फायदा! काय?

हे ऐकताच मुलांनी टाळ्यांचा कडकडाटच केला. मुले आनंदानी ओरडली. म्हणू लागली व्वा मस्त आयडिया! आणखी काही आयडिया सांगा.

इतक्यात एका मुलाने उभं राहून विचारलं, समजा आपल्याला नफा पण नको आणि तोटा पण नको, असं गणित सोडवता येईल का?

आता तर जोशी सर भितीने लटपटू लागले होते.

मी ताठ उभं राहून म्हंटलं, हो हो आणि हो!

जोशी सरांनी मला थांबण्याची खूण केली.

पण 'क्रांतीकारक आपले विचार मांडताना इतरांकडे दूर्लक्ष करतात' ही चिनी म्हण मला माहित असल्याने मी म्हणालो, हो एकदम सोप्पं आहे. गणपतला पाठीत चार रट्टे द्यायचे आणि पुन्हा कपबशा फोडल्यास तर तुझ्याकडून २७५ रुपये घेईन म्हणून सांगायचं... म्हणजे आपला नफा पण नाही आणि तोटा पण नाही!

हे ऐकताच मुले आनंदाने बेहोष होऊन वर्गात कल्ला करू लागली. आणि मी म्हणालो.. आता मी आणखी एक उत्तर सांगतो.

इतक्यात घंटा झाली. आणि.. जोशी सर मला लांबूनच कोपरापासून हात जोडत घाईघाईने वर्गातून निघून गेले.

गणित क्रांती यशस्वी झाली, असं मुलं म्हणाली.

(साभार)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)